शुक्रवार, ६ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २८८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज ‘जीतो कनेक्ट’चे उद्घाटन



**पुणे** : जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या (जीतो पुणे) वतीने ‘जीतो कनेक्ट २०२२’ आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन ६ ते ८ मे दरम्यान पुण्यात करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या शुक्रवारी (दि. ६) सकाळी ९.३० वाजता या परिषदेचे ऑनलाइन उद्घाटन होणार आहे. या वेळी केंद्रीय रस्ते, वाहतूक व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या परिषदेमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित ७६ वक्ते सहभागी होणार आहेत. व्यापार, उद्योग, प्रेरणा, फॅशन, अर्थकारण, स्टार्टअप इत्यादी अनेक विषयांवर व्याख्याने, चर्चासत्र, कार्यशाळा होणार आहेत.


**अंतरंग**

अवैध लाकूडतोड, खैर तस्करीप्रकरणी दोघे ताब्यात/२

६० फूट दरीत कोसळलेला ट्रेकर बालंबाल बचावला/६

श्री धापया महाराज कुस्ती आखाड्यात भावेश अजिंक्य/८


# स्वत:च्याच भूमीत प्रकल्पग्रस्त भाडेपट्ट्याने राहणार नाहीत

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सिडकोला इशारा

### गरजेपोटी घरासंदर्भातही लढ्याची तयारी | हक्कासाठी लढणार... इतिहास घडविणार!



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

९५ गावातील शेतकर्‍यांची जमीन घेऊन अनेक प्रकल्प सिडकोने उभारले, मात्र आता गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या बाबतीत सिडको व राज्य शासनाने घेतलेला निर्णय अन्यायकारक आहे. त्यामुळे या भूमीची मालकी हक्क असलेला प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र सिडकोने लादलेल्या निर्णयाच्या विरोधात असून येथील प्रकल्पग्रस्त स्वतःच्या मालकीच्या भूमीत भाडेपट्ट्याने राहणार नाही, असा इशारा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ५) येथे आयोजित करण्यात आलेल्या गरजेपोटी बांधकाम नियमन बैठकीत दिला, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी २४ जूनच्या नियोजित आंदोलनाप्रमाणे या विषयावरही आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी या वेळी दिला.

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, समितीचे संतोष केणे, जे. डी. तांडेल, दशरथ भगत, राजाराम पाटील, २७ गाव समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, रुपेश धुमाळ, नगरसेवक मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, युवा नेते दशरथ म्हात्रे, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, प्रभाकर जोशी तसेच पदाधिकारी व प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने सातत्याने केलेल्या आंदोलनाने जागे झालेल्या सिडको व राज्य शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांसंदर्भात नुकताच एक शासन निर्णय घेतला आहे, मात्र तो निर्णय प्रकल्पग्रस्तांच्या हिताचा नसून सिडको व शासनाच्या हिताचा आहे. एक अर्जाचा नमुना प्रकल्पग्रस्तांनी भरून द्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे, मात्र निर्णय करताना प्रकल्पग्रस्त संघटना व त्यांच्या प्रतिनिधींकडून सूचना न मागवता हा निर्णय प्रसिद्ध केला आहे. (पान २ वर..)

> **पुढच्या पिढीचा विचार करून आत्ताच आपल्याला योग्य निर्णय घ्यावा लागेल. नाहीतर सिडकोने जो निर्णय लादला आहे त्याचा परिणाम ६० वर्षांनी आपल्या पुढच्या पिढीला भोगावा लागणार आहे. त्यामुळे आपल्या एकजुटीची ताकद सिडको आणि राज्य सरकारला दाखवून देण्याची हिच वेळ आहे.**
>
> **– आमदार प्रशांत ठाकूर, कार्याध्यक्ष, लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती**

# पनवेल महानगरपालिकेचा करवाढविरहीत अर्थसंकल्प मंजूर

## बालिश कारणावरून विरोधकांचा चर्चा न करताच सभात्याग



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२१-२२चा सुधारित व सन २०२२-२३चा कोणतीही करवाढ नसलेला मूळ अर्थसंकल्प नगरसेवक हरेश केणी व अमर पाटील यांच्या सूचनांसह गुरुवारी मंजूर करण्यात आला, मात्र अर्थसंकल्पातील वेगवेगळ्या बाबींवर चर्चा करण्याऐवजी केवळ त्या त्या पक्षाच्या राज्यस्तरीय नेत्यांचे आपल्या भाषणात नाव न घेतल्यामुळे विरोधकांनी गदारोळ करून सभात्याग केला. त्यामुळे पनवेलकरांच्या सोयीसुविधा महत्त्वाच्या की, नेत्यांची नावे घेण्याचा केवळ उपचार महत्त्वाचा, हाच प्रश्न पालिकेत चर्चिला जात होता. (पान २ वर..)

> **खर्‍या अर्थाने अर्थसंकल्प हा महासभेपुढे येतो तो त्यावर चर्चा करण्यासाठी त्यातील खर्चाच्या आणि जमा बाजूवर चर्चा करण्यासाठी येतो, पण त्याऐवजी विरोधकांनी कोणाचे नाव घेतले, कोणाचे नाही यासाठी सभात्याग केला हे अत्यंत चुकीचे आहे. कोणत्याही आर्थिक बाबींवर त्यांनी आपले मत मांडलेले नाही. विरोधकांनी सभात्याग केला असेल तर आपण काही करू शकत नाही.**
>
> **–डॉ. कविता चौतमोल**, महापौर

> **विरोधकांना बजेटवर चर्चा करायची असती तर ते अर्धा तास आधी आले असते. त्यांना त्यावर काही मत व्यक्त करायचे नव्हते. फक्त अडथळाच आणायचा होता. बजेट हा सभात्यागाचा विषय नसतो. त्यामध्ये असलेल्या तरतुदींवर चर्चा करायची असते, सूचना करायच्या असतात. त्या त्यांना करायच्या नसल्याने काही तरी निमित्त करून त्यांनी सभात्याग केला. त्यामुळे आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधन सुविधांचा वापर करून नागरिकांचा विकास व्हावा यासाठी मांडलेले बजेट मंजूर करावे.**
>
> **–परेश ठाकूर**, सभागृह नेते

## निवडक

### शैक्षणिक धोरणात बदल होण्याचे संकेत


**नवी दिल्ली :** परीक्षेवरील चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रम बदलण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर आता शिक्षण सचिव अनिता करवाल यांनी सर्व मंत्रालयांना पत्र लिहून सूचना मागवल्या आहेत. गेल्या आठवड्यात, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही बेंगळुरूमध्ये एनसीईआरटी अभ्यासक्रमात बदल करणाऱ्या नॅशनल स्टिरिंग कमिटीच्या सदस्यांची भेट घेतली होती.

### इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू

**पुणे** : प्लॅस्टरचे काम सुरू असताना इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून पडून एका कामगाराचा मृत्यू झाला. भूषणकुमार साहू (वय ३०, रा. मोमीननगर, मांजरी) असे मृताचे नाव आहे. भूषणकुमार बी. टी. कवडे रस्त्यावरील बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावर बांबूच्या पहाडावर उभे राहून प्लॅस्टरचे काम करीत होता. त्यावेळी पडून त्याच्या डोक्यास गंभीर होऊन त्याचा मृत्यू झाला.

# मुंबई –गोवा महामार्गावर टँकर उलटला

- नागोठण्याजवळ अपघात; दोन वाहनांनी घेतला पेट
- पाच तास झाली होती वाहतूक कोंडी





**पाली : प्रतिनिधी**

मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावर नागोठणेतील कोलेटी गावाच्या नजीक बुधवारी रात्रीच्या सुमारास भरधाव वेगात येणारा केमिकलचा टँकर उलटला. अचानक टँकर उलटल्याने दोन प्रवासी वाहनांना टँकरची धडक बसून या वाहनांनी पेट घेतला. सुदैवाने प्रसंगावधान राखून देन्ही वाहनांतील प्रवासी कारबाहेर पडल्याने जीवितहानी टळली, मात्र या अपघातामुळे पाच तास महामार्ग ठप्प झाला होता.

नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार व ऋषिकेश विनायक बागवे यांच्या फिर्यादिनुसार, बुधवारी (दि. ४) रात्रीच्या सुमारास टँकर (क्र. एमएच ०४ केयु ५७३९)वरील चालक हा भरधाव वेगात वडखळहून नागोठणेकडे मुंबई-गोवा हायवेने जात होता. त्या वेळी अचानक त्याचे टँकरवरील नियंत्रण सुटले आणि टँकर रस्त्यावरच उलटला. यामुळे नागोठणेहून वडखळकडे जाणारी इर्टिका कार (नं. एमएच ०८ एएन ५३४९) व हुन्डाई अल्काझर कार (नं. एमएच ४६ बीझेड ४२३६) यांना टँकरची धडक बसली. अपघातात दोन्ही कारने पेट घतला. सुदैवाने कारमधील प्रवासी प्रसंगावधान राखून त्वरीत कारबाहेर पडल्याने जीवितहानी टळली. अपघातात साक्षीदार दर्याकुवर खिमसिंह राजपुत यांना किरकोळ दुखापत झाली असून आरोपी टँकरचालक याने अपघात झाल्यावर घटनास्थळावरून पळ काढल्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ड्रोनद्वारे हत्यारे पुरविणाऱ्या चार दहशतवाद्यांना अटक

**करनाल : वृत्तसंस्था**

हरियाणातील करनालमध्ये चार संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

या दहशवाद्यांना ड्रोनद्वारे शस्त्रास्त्रे पोहोचवण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. अटक करण्यात आलेले दहशतवादी दिल्लीमार्गे महाराष्ट्रातील नांदेड येथे निघाले होते. त्यामुळे त्यांचा महाराष्ट्रात घातपाताचा कट होता का? याचा तपास पोलीस करीत आहेत. अटक करण्यात आलेले सर्व आरोपी २० ते २२ वयोगटातील असून, त्यांचा पाकिस्तानशी संबंध असल्याचेही बोलले जात आहे. गुरप्रीत, संदीप, परमिंदर आणि भूपेंद्र अशी या दहशतवाद्यांची नावे आहेत.

## राणांच्या जात प्रमाणपत्रावरील सुनावणी जुलैपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



खासदार नवनीत राणा यांना सर्वोच्च न्यायालयाकडून आणखी एक दिलासा मिळाला आहे. जात प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या लोकसभेच्या खासदार नवनीत कौर राणा यांच्या अपीलावर जुलैमध्ये सुनावणी होईल, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (दि. ५) दिले आहेत.

अपक्ष खासदार नवनीत कौर राणा या महाराष्ट्रातील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या अमरावती मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी २२ जून रोजी राणा यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. जात प्रमाणपत्र हे बनावट कागदपत्रे वापरून फसव्या मार्गाने मिळवण्यात आल्याचे मत मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केले होते. राणा यांनी २०१९मध्ये अमरावतीमधून निवडणूक जिंकली होती. त्यात त्यांनी प्रतिज्ञापत्रात आपण मोची जातीतील असल्याचा दावा केला होता. न्यायमूर्ती विनीत सरन आणि न्यायमूर्ती जे. च्या. महेश्वरी यांनी या प्रकरणाची सुनावणी तहकूब केली असून, प्रकरणाची सुनावणी जुलैमध्ये करू, असे खंडपीठाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती सरन हे १० मे रोजी निवृत्त होणार असल्याने सुट्टीनंतर नव्या खंडपीठात या प्रकरणाची सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## ‘गेट वे’ पर्यटकांनी फुलला...



**मुंबई** : सध्या सुट्ट्यांचा हंगाम सुरू झाल्याने सर्वांचेच आकर्षण ठरत असलेल्या मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे गुरुवारी मोठ्या संख्येने पर्यटकांनी गर्दी केली होती. या ठिकाणी लागूनच असलेल्या समुद्राच्या सान्निध्यात पर्यटक रमले होते. (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## खारघरमध्ये पाणी प्रश्नावरून संताप

### भाजप आज करणार निषेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोने वसविलेल्या खारघरमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. येथील नागरिकांना अनियोजित पाणीपुरवठ्याचा त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी सिडकोकडे करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात भाजप खारघर- तळोजा मंडलच्या वतीने वेळोवेळी पाठपुरावा केला, मात्र याकडे सिडको दुर्लक्ष करीत असल्याने आता भाजप पदाधिकारी उद्या शुक्रवारी (दि. ६) सिडकोचा जाहीर निषेध करणार आहेत. या आंदोलनाचे नेतृत्व भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर करणार आहेत.

सिडकोने वेळोवेळी पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत तारीख देऊन खारघरवासियांची दिशाभूल केली असून शुक्रवारी सकाळी १० वाजता सिडकोच्या खारघर सेक्टर १४ येथे सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम व खारघर रेल्वेस्टेशनच्या पूर्वेला सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम पूर्णपणे बंद पाडू, यासाठी एकत्र यावे, असे आवाहन भाजप खारघर-तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केले आहे.

## शिवसेना खासदार भावना गवळी यांना हिशोब द्यावाच लागणार

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजप नेते किरीट सोमय्या यांचे आव्हान

शिवसेना खासदार भावना गवळी यांना चार वेळा समन्स देऊनही त्या एकदाही ईडी चौकशीसाठी हजर झाल्या नाहीत. यावरून किरीट सोमय्या यांनी भावना गवळी यांच्यावर टीका केली. भावना गवळी यांना इडिसमोर चौकशीसाठी हजर राहण्यात कशाची भीती वाटते? असा प्रश्न उपस्थित करीत त्यांना हिशोब तर द्यावाच लागेल, असे किरीट सोमय्या म्हणाले.

किरीट सोमय्या यांनी शिवसेनेच्या खासदार भावना गवळी यांच्यावर १०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. भावना गवळी यांनी सरकारची परवानगी नसतानाही कारखाना विकल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. १९९२ साली बालाजी पार्टीकल या कारखान्याची नोंदणी करून स्थापना केली. या कारखान्याला राज्य सरकारच्या हमीपत्रावर राष्ट्रीय सहकार निगमने ४३ कोटींचे कर्ज दिले मात्र, कर्ज मिळवूनही कारखाना २००० सालापर्यंत सुरू झालाच नाही. २००१ साली भावना गवळी या कारखान्याच्या अध्यक्ष झाल्या आणि २००२ साली या कारखान्याची जमीन बेकायदेशीरपणे दुसऱ्या संस्थेला विकली. राज्य सरकारने २००७ रोजी कारखाना विकण्याच्या प्रक्रियेला मान्यता दिली. यासाठी काही नियमावली बनवण्यात आली होती. २०१० साली हा कारखाना भावना अॅग्रो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला विकला. या व्यवहारालासुद्धा सरकारची परवानगी घेण्यात आली नव्हती. या संपूर्ण व्यवहाराच्या चौकशीसाठी शिवसेना खासदार भावना गवळी यांना ईडीने चार वेळा समन्स बजावण्यात आले होते. प्रत्येक वेळी त्यांचे वकील ईडी कार्यालयात हजर राहतात आणि वेळ मागून घेतात. यावरून भाजप नेते किरीट सोमय्या यांनी भावना गवळी यांना कशाची भीती वाटते? असा प्रश्न विचारत व्यवहाराबाबत उत्तर देण्याचे आव्हान त्यांनी दिले आहे.

# मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची माफी मागावी

## भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्योगपती अंबानींच्या घराबाहेर स्फोटके भरलेली गाडी उभी करून मनसुख हिरेनच्या हत्या कटात माजी पोलिस अधिकारी प्रदीप शर्मा यांचा सहभाग असल्याचा व त्यासाठी सचिन वाझे याने ४५ लाखांची सुपारी प्रदीप शर्माला दिल्याचा आरोप एनआयएने प्रतिज्ञापत्राद्वारे केल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आता या प्रकरणात गप्प न राहता वाझेची पाठराखण करून महाराष्ट्राचा अपमान केल्याबद्दल जाहीर माफी मागावी अशी मागणी भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजप प्रदेश सरचिटणीस आ. रवींद्र चव्हाण यावेळी उपस्थित होते.

उपाध्ये म्हणाले, सचिन वाझे काही लादेन आहे का? असा सवाल करत वाझेची विधिमंडळात पाठराखण करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आता थेट उत्तर दिले पाहिजे. मनसुख हिरेन यांची हत्या करण्यासाठी सचिन वाझेने माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा याला ४५ लाखांची सुपारी दिल्याची व या कटाची आखणी पोलीस आयुक्तालयात झाल्याची धक्कादायक माहिती एनआयएच्या प्रतिज्ञापत्रातून समोर आली आहे. सचिन वाझेप्रमाणेच प्रदीप शर्मा हे सुध्दा शिवसेनेमध्ये होते. त्यांनी शिवसेनेतर्फे निवडणूकही लढवली होती. त्यांचे शिवसेनेच्या अनेक नेत्यांसोबत घनिष्ठ संबंध होते. त्यामुळे राज्यात सत्ताधारी असलेल्या शिवसेनेशी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी केलेला हा गुन्हा अधिकच गंभीर आहे. त्यातच, हिरेनची हत्या करण्यासाठी सचिन वाझेने प्रदीप शर्मा यांना ४५ लाख रुपये दिल्याचीही माहिती समोर आली आहे. एका सामान्य पोलीस अधिकाऱ्याकडे एवढा पैसा आला कुठून, याचाही शोध घेतला गेला पाहिजे. तसेच हे दोघे पोलीस अधिकारी कुणाच्या इशाऱ्यावर गंभीर कृत्ये करत होते हेही समोर आले पाहिजे, अशी मागणी उपाध्ये यांनी केली आहे.



बाकी प्रत्येक गोष्टीत महाराष्ट्राचा अपमान शोधणाऱ्या व अन्य नेत्यांवर सुपारीबाजीचा आरोप करणाऱ्या शिवसेनेच्या नेत्यांनी शिवसेनेशी संबंध असलेल्या या पोलीस अधिकाऱ्यांच्या कृतीने पोलीस खात्याचा आणि राज्याचा सन्मान वाढला का, याचे उत्तर द्या असे थेट आव्हान त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिले. याच वाझेचे निलंबन रद्द करून त्याला पुन्हा सेवेत घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तगादा लावला होता. त्यामुळे या गुन्हेगारांसोबतचे लागेबांधे कुणाचे आहेत. त्यामुळे आता मूग गिळून गप्प न राहता ठाकरे यांनी समोर येऊन महाराष्ट्राच्या जनतेसमोर आपली भूमिका स्पष्ट करावी आणि अशा गुन्हेगारी प्रवृत्तीची पाठराखण करून महाराष्ट्राचा अपमान केल्याबद्दल व पोलीस दलाच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उभे केल्याबद्दल जाहीर दिलगिरी व्यक्त करावी अशी मागणीही उपाध्ये यांनी या दरम्यान केली आहे.

# अवैध लाकूडतोड, खैर तस्करी; दोघांना दोन ट्रकसह ताब्यात



**पोलादपूर : प्रतिनिधी**

वनविभाग पोलादपूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकाच आठवड्यात दोनवेळा केलेल्या कारवाईत दोन ट्रकसह पावणेदोन लाखांच्या मालासह दोन ट्रक असा एकूण १६लाख ८२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. अवैध लाकूडतोड व खैर तस्करांना पोलादपूर हद्दीत जेरबंद केल्याने महाड व पोलादपूर तालुक्यातील वनमाफियांना चांगलीच चपराक बसली आहे.

रोहे येथील उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत, सहाय्यक वनसंरक्षक विश्वजित जाधव तसेच महाडचे वनक्षेत्रपाल राकेश साहू यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या गुप्त बातमीवरून, पोलादपूर परिमंडळ वन अधिकारी शाम गुजर, वनरक्षक प्रशांत गायकर, नवनाथ मेटकरी, दिलीप जंगम, सचिन मेने, निलेश नाईकवाडे, प्रियांका जाधव यांनी मुंबई गोवा महामार्गावर पोलादपूर शहराबाहेर असणाऱ्या वन तपासणी नाका येथे ट्रक क्र.के.ए. ५६०६२२ ची तपासणी केली असता त्यामध्ये अवैध वृक्ष तोडीचा विना वाहतूक परवान्याचे आकेशिया घनमीटर १३.५८७ आकाराचे ५४ नग किंमत ५० हजार ४९० रुपये व ट्रक अंदाजे किंमत ९ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी झाकिउद्दिन मोहमद हुसेन (रा. त्रिपुरानाथ) व हावप्पा उर्फ अविनाश चिंचोलीकर (रा.कर्नाटक) या दोघांवर वन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करून कारवाई केली.

यानंतर दोन मे रोजी याच तपासणी नाक्यावरच ट्रक (क्र.एमएच ०५ के ९५३८) ची तपासणी केली असता त्यामध्ये अवैध वृक्ष तोडीचे वाहतूक परवाना नसलेले खैराचे ८.९२८ घ.मी. आकारमानाचे सोलीव ३७० नग १ लाख ३० हजार २५ रूपये अंदाजे किंमत व ट्रक अंदाजे किंमत ६ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# म्हसळ्यात एसटीची प्रवासी सेवा आली रुळावर

**म्हसळा : प्रतिनिधी**

संपामुळे ठप्प झालेली एसटीची प्रवासी सेवा आता हळूहळू रुळावर येत आहे. रायगड विभागांत बहुतांश कर्मचारी कर्तव्यावर हजर झाले असून, गाव तिथे एसटी दिसायला लागली आहे. एसटीच्या प्रतीक्षेत असलेल्या गावागावातील नागरिकांनीही सेवेला चांगला प्रतिसाद दिला आहे. सध्या जिल्ह्यातील आठही डेपोतून एसटीच्या बसेस पुन्हा धावू लागल्या आहेत. प्रवासी वाढल्याने जिल्ह्यातील एस.टी. चे उत्पन्नातही वाढ झाली आहे. पर्यायाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून आर्थिक व्यवहारही प्रचंड वाढत असल्याचे चित्र आहे.

या सर्व प्रकारांना रायगड विभागातील सर्व डेपो स्टँड आणि प्रवाशी यांची

### एसटीच्या प्रगतीला बीएसएनएलचा अडसर

दूरध्वनीव्दारे असणारा संपर्क नसल्याने प्रवाशाना योग्य सेवा देता येत नाही अशी तक्रार सर्व डेपो, स्टँड व प्रवासी संघटनांकडून होत आहे.

कनेक्टिंग पीपल असे ब्रीद वाक्य असलेल्या बीएसएनएलची सेवा रायगड विभागातील अलिबाग, पेण, कर्जत, श्रीवर्धन, महाड, माणगाव, रोहा, मुरुड या डेपोतून आणि त्या अंर्तगत येणाऱ्या महाड, पोलादपूर, आंबेत, श्रीवर्धन, म्हसळा, बोर्ली, माणगाव, गोरेगांव, इंदापूर, तळा, मुरुड, रेवदंडा, अलिबाग, रेवस, पोयनाड, वडखळ, नागोठणे, पाली, पेण, रामवाडी, खोपोली, कर्जत या सर्व स्टँडमध्ये असणारे बीएसएनएलचे फोन बंद असल्याने प्रवाशांना पारदर्शक सेवा देत येत नाही अशी तक्रार या एस.टी. डेपो व्यवस्थापनाची आणि प्रवासी, विविध प्रवासी संघटनांची आहे. या मुळे एसटीला पुन्हा काही समस्या येत आहेत.



**दळण वळण क्षेत्रात प्रचंड स्पर्धा, आणि तत्पर सेवा देणाऱ्या बीएसएनएल व्यतीरिक्त अन्य कंपन्या बाजारात कार्यरत असतात. त्यांच्या कार्पोरेट स्कीम खाली अनेक फायद्याच्या योजना असतात. त्यांच्या सेवा रायगड परिवहन विभागाने घेणे आवश्यक आहे.**
**–अनिल महामुनकर, सचिव,एस.टी. प्रवासी संघटना, म्हसळा.**

**बीएसएनएल दूरध्वनी बंद असल्याने आमच्या सेवेत सातत्याने व्यत्यय येत असतो. आमचे स्थानिक अधिकारी यांच्याकडून टेलिफोन विभागाला आणि टेलिफोन विभागाच्या मुख्य कार्यालयात तक्रारी करूनही योग्य ती दखल घेतली जात नाही.**
**–अनघा बारटक्के,**
**विभागीय नियंत्रक, पेण– रायगड.**

# कोकण विभागीय विकास प्रदर्शनाचा समारोप

**ठाणे : रामप्रहर वृत्त**

शहराचा सांस्कृतिक ठेवा असलेल्या प्राचीन अशा टाऊन हॉलमध्ये गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या कोकण विभागीय विकास प्रदर्शनाचा समारोप गुरुवारी (दि. ५) झाला. याठिकाणी ठेवण्यात आलेल्या अभिप्राय नोंदवहीमध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार, माहिती व जनंसपर्क विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी यांच्यापासून ते सामान्य नागरिकांनी प्रदर्शनाविषयी भरभरून मत व्यक्त केले.

कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाचा समारोप झाला. यावेळी टाऊन हॉलमध्ये झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात डॉ. मुळे यांनी प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. नूतनीकरण झालेल्या ठाण्यातील ऐतिहासिक टाऊन हॉलमध्ये आयोजित या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

भक्कम तटबंदी असलेल्या किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या विविध विभागांनी गेल्या दोन वर्षात केलेल्या विकास कामांची सचित्र माहिती देणारे स्वतंत्र पॅनलद्वारे माहिती देण्यात आली.

# आता सुट्टीकाळ पगाराविना!

## अन्याय होत असल्याची मानधनावरील शिक्षकांची व्यथा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका शिक्षण विभागात कायमस्वरूपी शिक्षकांबरोबर ठोक मानधनावर काम करणारे शिक्षकही मोठ्या प्रमाणात आहेत. समान काम समान वेतन अशी या शिक्षकांची मागणी आहे. त्यात सुट्टीकाळातही या शिक्षकांना पगार मिळत नसल्याने आमच्यावर हा अन्याय का असा सवाल या शिक्षकांनी केला आहे.

आम्हीही शिक्षक असून पालिकेच्या प्राथमिक विभागात शिक्षणाचेच काम करतो. अनेक वर्षे काम केल्यावरही ठोक मानधनावर म्हणून सुट्टीत पगार दिला जात नाही. कायम शिक्षकांना मात्र उन्हाळी सुट्टी म्हणून घरी बसून पूर्ण पगार दिला जातो. हा आमच्यावर अन्याय आहे. कोरोनाकाळातही कायम शिक्षकांप्रमाणेच काम केले आहे. शिक्षण घेऊन अशी अवहेलना अतिशय वेदनादायक असल्याचे ठोक मानधनावरील प्राथमिक शिक्षक सिद्धराम शिलवंत यांनी सांगितले.

राज्यात महापालिका शाळांत पटसंख्या कमी होत असताना नवी मुंबई पालिकेच्या शाळांमध्ये मात्र चांगली पटसंख्या आहे. यासाठी कायमस्वरूपी शिक्षकांसह हे ठोक मानधनावरील शिक्षक काम करत आहेत. मात्र ठोक मानधनावर असलेल्या शिक्षकांना काही पटीत कमी पगार मिळत आहे. त्यामुळे समान काम करत असल्याने समान काम समान वेतन देण्याची हे मागणी शिक्षक करत आहेत. कोरोनाकाळात अत्यावश्यक सेवा म्हणून सर्वांनाच कोरोनाचे काम करावे लागले. तेव्हाही मानधनावरील शिक्षकांनी काम केले आहे. या शिक्षकांना महिन्यातून फक्त एक सुट्टी घेता येते. त्यापेक्षा अधिक सुट्टी घेतल्यास त्या दिवसाचे मानधनही कापले जाते. दिवाळी व उन्हाळी सुट्टीचे मानधन त्यांना दिले जात नाही. शाळेचा निकाल चांगला लागावा, यासाठी सर्वच शिक्षक मेहनत घेत असताना पगारातील तफावतेमुळे शिक्षकांमध्ये असंतोष आहे. याबाबत योग्य निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

## नवी मुंबईत दोन दिवस पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई: रामप्रहर वृत्त**

ठाणे जिल्ह्याला पाणी पुरवठा करणाऱ्या बारवी गुरुत्व जलवाहिन्यांच्या दुरुस्तीचं काम येत्या शुक्रवार आणि शनिवारी करण्यात येणार आहे. त्यासाठी बारवी धरणातून पाणी पुरवठा होणाऱ्या नवी पनवेलसह शहरांचा शुक्रवारी दुपारी १२ वाजल्यापासून शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंत २४ तास पाणी पुरवठा बंद केला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे आणि दोन दिवस पुरेल इतका पाणी साठा करून ठेवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यासह नवी मुंबई, मिरा भाईंदर, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायती आणि औद्योगिक वसाहतींना बारवी धरणातून पाणी पुरवठा केला जातो.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. ६ मे २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामीण लसीकरण**

■ मुर्बी ■ सिध्दी करवले नागझरी/ चाल ■ पडघे ■ खिडुकपाडा ■ खुटारी इनामपुरी ■ धरण/धरणा कॅम्प

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२–१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८–५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल. या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८–५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/ दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अँप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.


पान १ वरून

## स्वतःच्याच भूमीत प्रकल्पग्रस्त भाडेपट्ट्याने राहणार नाहीत

त्यामुळे पुन्हा एकदा सिडकोने प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांविरोधात डाव रचला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या २५० मीटर बाहेरील बांधकामांचे काय होणार? याचे उत्तर सिडकोकडून अनुत्तरित आहे. त्याचबरोबर प्रत्येक गावची भौगलिक सीमा वेगवेगळी आहे. काही गावे महामार्ग किंवा खाडीलगत आहेत. तेथे एकाच दिशेस २५० मीटरपेक्षा जास्त बांधकामे वाढलेली आहेत, त्या गावातील प्रकल्पग्रस्तांच्या बांधकामाचे काय, प्रकल्पग्रस्तांच्या व्यावसायिक गाळ्यांचे काय, मालकी हक्काची मालमत्ता सोडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी ती भाड्याने नावावर करण्याची संमती सिडकोकडे का मागावी, बांधकामे नियमित करण्याचा दर हा शेतकऱ्यांस, जमिनीस मिळालेला दर अधिक सिडको डेव्हलपमेंट चार्जएवढाच का नसावा, बांधकामे नियमित करीत असताना भूखंड पात्रतेची माहिती कशासाठी मागवली जात आहे, असे अनेक प्रश्न या बैठकीत उपस्थित झाले आहेत. शासन निर्णयात प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सिडको व पर्यायाने शासनाची उदासीनता उघड झाली आहे. त्या अनुषंगाने सिडकोला व शासनाला लेखी पत्र देण्यात येणार असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले तसेच हक्कासाठी लढणार... इतिहास घडविणार! असा समज वजा इशारा या बैठकीतून सिडको व राज्य शासनाला देण्यात आला आहे.

पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव लागलेच पाहिजे हा आपला एक प्रमुख लढा आहे. त्याचबरोबर येथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविणे हा सुद्धा या लढ्यातील भाग असून प्रकल्पग्रस्तांवर अन्यायाची वेळ येईल, त्या वेळी या लढ्याला धार देण्याचे काम आपल्याला ठेऊन त्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे आणि त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची आपली कायम तयारी असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगून प्रकल्पग्रस्तांना मोठा धीर दिला.

९५ गावातील लाखो प्रकल्पग्रस्त आणि त्यांची लाखो घरे आहेत. अनेकांची पाच–पाच एकर जागा सिडकोने संपादित केली आहे. घरे नियमित करण्यासाठी भरमसाठ रक्कम सिडकोकडून आकारली जाणार आहे. प्रकल्पग्रस्तांची एवढी जागा घेऊनही जर प्रकल्पग्रस्त भाडेतत्त्वावर राहण्यास सक्ती करत असाल, तर ते आम्हाला कदापिही मान्य नाही. विमानतळाला दि. बा. साहेबांचे नाव देण्यासाठी बॅनरवर सह्या करणारे महाविकास आघाडीचे स्थानिक नेते मागे हटले, आता प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या बाबतीतही मागे हटणार का? असा सवाल उपस्थित करून प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याबाबत स्थानिक महाविकास आघाडीच्या नेत्यांची काय भूमिका आहे हे जाहीर करा, असे आव्हानही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिले तसेच २०१५ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट बांधकाम नियमित करण्याचे आदेश दिले होते, याची आठवणही त्यांनी या बैठकीतून शासनाला करून दिली. घरे नियमित करण्याच्या आडून सिडको प्रकल्पग्रस्तांच्या मानगुटीवर बसण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो प्रयत्न हाणून पाडूया, असे आवाहनही त्यांनी प्रकल्पग्रस्तांना या बैठकीतून केले.

## पनवेल महानगरपालिकेचा करवाढविरहीत अर्थसंकल्प मंजूर

पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष सन २०२१–२२ चे सुधारित व सन २०२२–२३ चे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यासाठी गुरुवारी (दि. ५) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व सदस्य उपस्थित होते.

स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांनी अंदाजपत्रकाची प्रत महापौरांना सादर केल्यावर मनोगत व्यक्त करताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे नाव घेतले नाही म्हणून राष्ट्रवादीचे सतीश पाटील यांनी हरकत घेतली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव घेतल्यावर शेकापचे विधान परिषद सदस्य बाळाराम पाटील यांचे नाव घेतले नाही असे सांगत शेकापच्या सदस्यांनी हरकत घेतली. या वेळी नरेश ठाकूर यांचे मनोगत सुरू असताना विरोधकांनी महापौरांसमोर जाऊन गदारोळ केला, तर विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी चक्क नरेश ठाकूर यांच्यासमोरील माईक बंद करून संविधानिक नियमाला हरताळ फासला.

महापौरांनी, नरेश ठाकूर हे त्यांचे मनोगत व्यक्त करीत आहेत ते झाल्यावर तुम्ही बोला, असे सांगूनही विरोधकांनी आमदार बळाराम पाटील यांचे नाव घेण्याचा हट्ट सुरूच ठेवून सभा त्याग केला. विरोधी पक्षाच्या हरेश केणी, बबन मुकादम व दोन महिला सदस्यांसह एकूण पाच सदस्यांनी सभा त्याग केला नाही. त्यानंतर हरेश केणी व अमर पाटील यांच्या सूचनांसह अंदाजपत्रक मंजूर करण्याची सूचना सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मांडली. महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी आर्थिक वर्ष सन २०२१–२२चे सुधारित व सन २०२२–२३चे मूळ अंदाजपत्रक मंजूर झाल्याचे जाहीर केले.

# दापोलीत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचा शुभारंभ

## भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याहस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून तालुक्यात अनेक विकासाची कामे सुरु आहेत. या अंतर्गत दापोली गावात स्थानिक आमदार विकास निधीमधून रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी त्यांनी ठेकेदाराला काम वेळेत व दर्जेदार करावे अशा सूचना दिल्या.

उरण तालुक्याचा सर्वांगिण विकास आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून होत असून, अनेक विकासाची कामे त्यांच्या आमदार निधीमधून केली जात आहेत. त्याअंतर्गत दापोली गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण आमदार महेश बालदी यांच्या ५ लाख स्थानिक आमदार विकास निधीमधून होणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याहस्ते झाले. या वेळी भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, पंचायत समिती सदस्या रेखा म्हात्रे, माजी सदस्या सुजाता जितेकर, रोशन जितेकर, माजी सरपंच सुभाष म्हात्रे, गोरधन डाऊर, माजी उपसरपंच गजानन पाटील, बबन म्हात्रे, बाळाराम म्हात्रे, महेंद्र जितेकर, विष्णू घोपरकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.





पनवेल : भाजप पनवेल शहर उपाध्यक्ष सतीश पाटील यांचा वाढदिवस बुधवारी साजरा झाला. या निमित्त भाजप ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. भाजपच्या मध्यावर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला नगरसेवक नितीन पाटील, युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयूरेश नेतकर, युवा नेते केदार भगत, प्रीतम म्हात्रे, परेश पाटील, अनिकेत भोईर, रुपेश कावळे, विवेक होन आदी उपस्थित होते. तसेच वाढदिवसानिमित्त सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही सतीश पाटील यांना शुभेच्छा दिल्या.



पनवेल : भाजप पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांना वाढदिवसानिमित्त भाजप ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी बुधवारी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर कोषाध्यक्ष देवांशु प्रभाळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# जेएनपीएकडून भूखंडाची प्रतीक्षा कायम

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीए प्रकल्पग्रस्तांनाही साडेबारा टक्केचे विकसित भूखंड मिळावे यासाठी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढा झाल्याने २०११ ला जेएनपीएने साडेबारा टक्के देण्याचे मान्य केले होते. मात्र मागील ११ वर्षांपासून जेएनपीएकडून प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाची प्रतीक्षाच आहे.



१६ मार्च २०२२ ला या कामाची निविदा कंत्राटदारांना दिली असली तरी आतापर्यंत काम सुरू झालेले नाही. तर दुसरीकडे मे महिना सुरू झाल्याने भूखंडाच्या विकासाचे काम पुढील सहा महिन्यांसाठी पुढे जाण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

जेएनपीपीए 'साडेबारा टक्के'चे भूखंड देण्यासाठी जेएनपीएने करळ ते दास्तान फाटा दरम्यानची १११ हेक्टर जमीन आरक्षित केली आहे. या जमिनीवर साडेबारा टक्केचे भूखंड विकसित करण्याची जबाबदारीही दिलेली आहे. त्याकरिता लागणारा निधी जेएनपीटीने वर्ग केला आहे.

मात्र या कामाची निविदा काढण्यात दिरंगाई केली जात होती. सर्व पक्षीय संघर्ष समितीने १७ मार्च रोजी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर १६ मार्चला सिडकोकडून जेएनपीए साडेबारा टक्के भूखंडाच्या विकास कामाला मंजूरी देण्यात आल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र जेएनपीटी साडेबारा टक्के भूखंडाच्या विकासाचे काम सुरू न झाल्याने जेएनपीए प्रकल्पग्रस्तांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या संदभार्त सिडकोच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता याबाबत बघावे लागेल अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

# विंधणे आदिवासीवाडीत विविध दाखले वाटप

**उरण : प्रतिनिधी**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून कातकरी उत्थान अभियान अंतर्गत उरण तालुक्यातील विंधणे आदिवासी वाडीवर तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. ५) विविध प्रकारच्या दाखले वाटपाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमात तहसिलदार अंधारे आदिवासींना मार्गदर्शन करताना म्हणाले की, तालुक्यात एकही आदिवासी बांधव कोणत्याही दाखल्यासाठी वंचित राहणार नाहीत किंवा कोणत्याही योजनेपासून वंचित राहणार नाहीत, यासाठी आम्ही आमची टीम सातत्याने काम करत आहे. या बांधवाना रेशनकार्ड कार्ड मिळाले आहे त्यांनाही लवकर अंत्योदय योजनेतून धान्य दिले जाईल. आजपर्यंत तालुक्यात ८० ते



९० टक्के जातीचे दाखले पूर्ण झाले आहेत असेही त्यांनी यावेळी नमूद केले आहे.

नायब तहसिलदार नरेश पेढवी म्हणाले, आपल्या समाजाने पुढे यायचे असले तर घरातील प्रत्येक स्त्रीने कुटुंबाकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या मुलांचे आरोग्य चांगले ठेवले पाहिजे. त्यांच्या खाण्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. मुलांना शाळेची ओढ लावली पाहिजे. मुले शाळेत गेली तरच ती आपले भविष्य घडवू शकतील. मात्र घरातील सर्व महिलांवर हे अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी महिलांनी आपले आदिवासी नृत्य सादर करून उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

यावेळी जातीचे दाखले, रेशनकार्ड ,वनहक्क दाखले यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे प्रा. राजेंद्र मढवी, केअर ऑफ नेचर संस्थेचे राजू मुंबईकर, विंधणे उपसरपंच भारत डाकी, महसूल सहाय्यक शिवाजी सुर्यवाड, मंडळ अधिकारी एस.आर. रोडे, महा सेवा केंद्राचे अजय ठाकूर, वनरक्षक शितल पाटील, विंधणे पोलीस पाटील शुभांगी पाटील, तलाठी अर्जुन जमखंडी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, दत्ता गोंधळी, विशाल पाटील,अनिल घरत,शिक्षक राजेश चौगले आदी उपस्थित होते.

# माती चोरीमुळे बुडतोय शासनाचा महसूल

**पनवेल : वार्ताहर**

माती चोरीचे पनवेल तालुक्यात प्रमाण वाढू लागले आहे. वीटभट्टीसाठी व अन्य कारणांसाठी मोठ्या प्रमाणात माती चोरी केली जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

पनवेल तालुक्यात सध्या वीट भट्टीचा व्यवसाय सुरू असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात माती चोरी केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. रॉयल्टी बुडवून आणि शासनाची फसवणूक करून मातीची वाहतूक केली जात आहे. बेकायदेशीरपणे उत्खनन चालू असताना देखील तलाठी, मंडळ अधिकारी यावर कारवाई का करत नाही असा सवाल स्थानिक विचारत आहेत. वन विभाग, शासकीय जागेतून शासनाची रॉयल्टी बुडवून मातीची चोरी विविध वाहनांमधून केली जात आहे. पोलीस, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या डोळ्यादेखत मातीचे डंपर जात असताना देखील त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. याउलट माती चोरांना प्रशासनाकडून अभय दिले जात असल्याचे बोलले जात आहे. दिवसाढवळ्या पनवेल परिसरातून मातीचे ट्रक, डंपर भरून शेकडो ब्रास माती वाहून नेली जात आहे. मात्र शासनाचा महसूल बुडत असताना देखील कारवाई केली जात नाही. ठिकठिकाणी मातीची चोरी होत असून मातीसाठी खड्डे खणले जात आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.

**नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास**

पनवेल तालुक्यात रस्ते, इमारतीची कामे वीटभट्टीच्या कामांना वेग आला आहे. १०० ब्रास मातीची रॉयल्टी भरून ५०० ब्रास पेक्षा अधिक माती नेऊन शासनाची फसवणूक केली जात आहे. याकडे तलाठी, मंडळ अधिकारी डोळेझाक करताना दिसून येत आहेत. अनेक ठिकाणी भरावासाठी लागणारी माती नेली जात आहे. या मुळे नैसर्गिक संपत्तीचा नाश होत आहे.

# केमिस्ट असोसिएशनतर्फे विविध कार्यक्रम

**उरण: वार्ताहर**

केमिस्ट असोसिएशन उलवे या संस्थेच्या वतीने एक मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त उलवेतील फार्मासिस्ट बंधू भगिनींनी महाराष्ट्रीयन वेशभूषा परिधान करून बाईक रॅली काढण्यात आली होती. तसेच फार्मसिस्ट बंधू भगिनींकरिता फार्मसी व्यवसायासबंधित स्लोगन स्पर्धेचे आयोजन केले होते. या वेळी आयोजित वेशभूषा स्पर्धेचे एनआरआय पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक संदीप शिरसाठ यांनी स्पर्धेचे पारितोषिक पटकावले. फार्मसी व्यवसायासंबंधित स्लोगन स्पर्धेचे पारितोषिक रोहित शिंदे आणि धनश्री शिंदे या फार्मासिस्ट जोडप्याने पटकावले. संस्कृतीची जोपासना करणे, हे आपले कर्तव्य आहे. भारतीय सण समारंभ, दैनंदिन जीवनातही आपल्या संस्कृतीचाच अंगीकार केला पाहिजे, असे मत केमिस्ट असोसिएशन उलव्याच्या अध्यक्षा सीमा सुभाष पाटील यांनी व्यक्त केले. त्या महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या रॅलीची सांगता लांगेश्वर मंदिराजवळ झाली.

# उरण येथे बाल संस्कार, शिशु संस्कार वर्ग

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर येथे श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बाल संस्कार समाज मंदिर दिंडोरी यांच्या वतीने दर शनिवारी सायंकाळी सहा ते सात या वेळेत मोफत बाल संस्कार व शिशु संस्कार वर्ग घेतले जात आहेत.

गेले सहा वर्षापासून हे कार्य सुरु आहे. उरण शहरातील १५ वर्षा पर्यंतच्या वयोगटातील मुलांनी याचा लाभ घेतला आहे. या संस्कार वर्गात मुलांना प्रार्थना, स्तोत्र मंत्र, पारंपरिक खेळ, महापुरुषांची माहिती, व्यायाम, सूर्य नमस्कार, संस्कार अशा विविध प्रकारची माहिती दिली जाते.

मुलांच्या अंगी कोणते गुण असावेत, मुलांच्या कलागुणांना विकास कसा होईल या कडे लक्ष दिले जाते. कार्यक्रम झाल्यानतर



मुलांना खाऊ वाटप करण्यात येते. या संस्कार शिबिरात प्रतिनिधी सुरेखा सुनील फेगडे, साक्षी सुहास गवस, स्वाती घरत, अनिता परमार, दीपिका म्हात्रे आदी मेहनत घेत असल्याचे सांगण्यात आले.


# उरणमध्ये ई-श्रम कार्डवाटप, वृक्षारोपण कार्यक्रम

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

वाढदिवस काहीतरी समाजहितासाठी साजरा व्हावा या उद्देशाने उरणमधील श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या अध्यक्षा रायगड भूषण संगीता ढेरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि.३) उरण शहरात ई-श्रम कार्डवाटप आणि वृक्षारोपण कार्यक्रम घेतला.

कोटगाव काळाधोंडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारातील मोकळ्या जागेत व व्यायाम शाळेच्या आजुबाजुला शोभेची झाडे व फुलझाडे लावून वृक्षारोपणाचा कार्यक्रम तसेच याच ठिकाणी ई-श्रम कार्डवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वृक्षारोपण व ई-श्रम कार्डवाटप या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केअर ऑफ नेचरचे अध्यक्ष रायगडभूषण राजु मुंबईकर, सामाजिक कार्यकर्ते अनिल घरत,






कोटगावचे अध्यक्ष योगेश गोवारी, काळाधोंडा जिल्हा परिषद शाळेचे चेअरमन नवनीत भोईर, ज्येष्ठ नागरिक शंकर भोईर, कोटगावचे पंच कमिटी सदस्य जितेंद्र भोईर, व इतर कोटगाव ग्रामस्थ, श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरणच्या अध्यक्षा संगीता ढेरे, उपाध्यक्षा पुजा प्रसादे, वैदेही वैवडे, कविता म्हात्रे, सुप्रिया सरफरे, अभया म्हात्रे, सारीका भोईर, महिमा म्हात्रे, अष्टभुजा हिरकणी व पत्रकार तृप्ती भोईर, साहिल प्रसादे, शाम भाऊ भोईर आदी उपस्थित होते.

मान्यवरांना एक एक रोप देऊन त्यांचाही सत्कार करण्यात आला. केअर ऑफ नेचरचे अध्यक्ष राजू मुंबईकर यांनी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था उरण या संस्थेसाठी ई-श्रम कार्ड मोफत उपलब्ध करून दिले. तसेच त्यांनी व अनिल घरत यांनी संगीता ढेरे यांच्या हातून वेळोवेळी होणाऱ्या समाजकार्यातील योगदानाचा इथे विशेष उल्लेख केला. जमलेल्या प्रत्येक मान्यवरांच्या हस्ते शोभेची व फुलझाडे लावण्यात आली तसेच या लावलेल्या झाडांना पाणी घालण्यात आले.

# तत्काळ तिकिटांवर एजंटांचा डोळा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तत्काळ आरक्षित तिकीट काढण्यासाठी रेल्वे मंत्रालयाची ऑनलाईन वेबसाईट कायम सुरु असते. दोन मिनिटात आरक्षित तिकीट काढण्यासाठी रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकी समोर थांबावे लागते. पहिल्या येणाऱ्या तीन ते चार जणांना हे तत्काळ तिकीट मिळत असते. मात्र रेल्वे स्थानकातील एजंट आपली माणसे या रांगेत उभी करून तत्काळ तिकीट आपल्या पारड्यात पाडून घेत असतात. यामुळे गरजुंना तत्काळ तिकीट वेळेत मिळत नाही. असाच प्रकार नुकताच घडला आहे. एक व्यक्ती तिकीट काढण्यासाठी गेले असता पनवेल रेल्वे स्थानकात त्यांना हा प्रकार आढळून आला. या व्यक्तीने याबाबतची तक्रार केल्यानंतर दुसऱ्या दिवशी रेल्वे प्रशासन खडबडून जागे झाल्यांनतर तत्काळ तिकीट खिडकीजवळ एजंट फिरकले नाहीत. रेल्वे स्थानकात सर्रास हा प्रकार सुरु असून याबाबत नाराजी आहे.

# धानसर येथे किराणामाल कंपनीत आठ लाखांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

धानसर येथे किराणामाल कंपनीतून ८ लाख १० हजार ५९५ रुपयांचा चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




धानसर येथे मिराबो प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अदानी कंपाउंड येथे आहे. कंपनीत अवेस मोमीन व अदनान शेख हे डिस्पॅच सुपरवायझर म्हणून काम करतात. कंपनीचे ऑडिटर निलेश वर्मा यांनी रूटीन चेकअप केले असता प्रिया ऑईलचा १५ लिटर डब्यांच्या स्टॉकमध्ये पंचवीस डबे कमी असल्याचे निदर्शनास आले. सीसीटीवी फुटेज चेक केले असता रोहित ट्रान्सपोर्ट यांच्याकडील चालक अनिकेत पवार यांच्या टेम्पोमध्ये १५ लिटरचे पंचवीस डब्बे जास्त लोड केले असल्याचे दिसून आले. यावेळी सुपरवायझर अवेस मोमीन, अदनान शेख, सिक्युरिटी गार्ड केशव पाल, चालक अनिकेत पवार यांच्याकडे चोरीबाबत विचारपूस केली. यावेळी सिक्युरिटी केशव पाल आणि अनिकेत पवार यांनी सदरची चोरी डिस्पॅच सुपरवायझर अवेस मोमीन आणि अदनाम शेख यांच्या सांगण्याप्रमाणे केल्याचे कबूल केले. चौघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## संपादकीय

# पुन्हा न्यायालयीन चपराक

महाविकास आघाडी सरकारचा मनमानी कारभार धुडकावून लावत सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा या तीनचाकी सरकारला सणसणीत चपराक लगावली आहे. ओबीसी आरक्षणाशिवाय महापालिका, जिल्हा परिषदा आदींच्या निवडणुका न घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता, परंतु राज्य सरकारने केलेला कायदा फेटाळून लावत, १५ दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा असा स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. हा आदेश म्हणजे आघाडी सरकारचे कितवे अपयश म्हणायचे?

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आता कोणत्याही कारणांवरून टाळाटाळ करता येणार नाही. मुंबई महापालिकेसह राज्यातील नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अकोला, चंद्रपूर, पंढरपूर, मालेगाव, परभणी, लातूर, अमरावती आदी महापालिकांच्या निवडणुका रखडल्या आहेत. यापैकी काही महापालिकांवर प्रशासकही नेमण्यात आला आहे. कार्यकाळ संपल्यानंतर महापालिकांवर प्रशासक नेमण्याची तरतूद कायद्यात असली तरी सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ पालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती ठेवता येत नाही. संविधानानेच ती खबरदारी घेतली आहे. त्या आधारेच आदेश देताना, दोन आठवड्यांमध्ये या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करा असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. आधी कोरोना महासाथीचे संकट आणि नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांसाठी ओबीसी आरक्षण आवश्यक असल्याचे सांगत राज्यातील महाविकास आघाडी सरकारने वेळकाढूपणा केला. एकंदर जे घडले आहे त्याने एका तऱ्हेने आघाडी सरकारने ओबीसींच्या पाठीत खंजीरच खुपसला, परंतु राज्य सरकारचा बेजबाबदारपणा खपवून न घेता सर्वोच्च न्यायालयाने परखडपणे ताबडतोबीने निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याचा आदेश दिला आहे. अर्थात या निकालामुळे आता ओबीसींच्या आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे स्पष्ट झाले आहे. यामुळे ओबीसींच्या आरक्षणाला धोका निर्माण झाला असून यातून या समाजाचे नुकसान होणार की, काय? असा प्रश्नही विचारला जातो आहे. तसे घडल्यास हे तीनचाकी आघाडी सरकारच त्यास पूर्णपणे जबाबदार असेल. भारतीय जनता पक्षाने मात्र ओबीसी समाजाला न्याय देण्याची आपली भूमिका तत्परतेने जाहीर केली असून या निवडणुकांमध्ये भाजप २७ टक्के आरक्षणाच्या जागांवर ओबीसी कार्यकर्त्यांना उमेदवारी देईल असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाला आता राज्यभरातील १५हून अधिक महापालिका तसेच जवळपास २५ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची तयारी सुरू करावी लागणार आहे. एक प्रकारे महाराष्ट्रात छोटीशी सार्वत्रिक निवडणूकच पार पडणार असल्याचे कुणी म्हटले तर ते वावगे ठरू नये. यातली मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वच पक्षांसाठी किती महत्त्वाची आणि अटीतटीची ठरणार आहे याची चिन्हे तर यापूर्वीपासूनच दिसत आहेत. गेली २५ वर्षे ही महापालिका आपल्या ताब्यात ठेवून शिवसेनेने कुणाचा विकास साधला हे काही लपून राहिलेले नाही. तेच सारे पुढे सुरू ठेवण्यासाठी या खेपेला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेऊन मैदानात उतरणाऱ्या शिवसेनेला यश मिळते का हे येणारा काळच दाखवेल. गेले अनेक दिवस या निवडणुकीकडे लक्ष ठेवून तापलेले राजकीय वातावरण आता अधिकाधिक तापत जाणार हे उघड आहे.**






# रायगडच्या विकासाला गती

| महामार्ग | किंमत | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|
| १. दिघी माणगाव | ४५७ कोटी | ९४.२८ टक्के पूर्ण |
| २. आगरदांडा इंदापूर | ३५५ कोटी | ९४. ६३ टक्के पूर्ण |
| ३. पुणे हद्द ते माणगाव | २२३ कोटी | ९८.०० टक्के पूर्ण |
| ४. वाकण पाली खोपोली | ३७६ कोटी | ८६.५३ टक्के पूर्ण |
| ५. पाटगाव खोपोली | ११९ कोटी | ९०.८८ टक्के पूर्ण |
| ६. पेण खोपोली | ३०१ कोटी | ६२.७६ टक्के पूर्ण |

**मुंबई-गोवा महामार्ग सद्यस्थिती**

**पनवेल ते इंदापूर - ८४ किमी - ९४२ कोटी - नवीन कंत्राटदार कार्यवाही सुरू**

**इंदापूर ते वडपाले - २६ किमी - १२०२ कोटी - ३५ टक्के पूर्ण**

**वीर ते भोगाव खूर्द - ३८.७८ किमी - १५९८ कोटी - ७९.९० टक्के पूर्ण**

**भोगाव ते खावटी - ८.९ किमी - ७४३ कोटी - ७६.९० टक्के पूर्ण**

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

ज्या भागत दळण-वळणाच्या सुविधा चांगल्या आहेत तेथील विकास वेगाने होतो. रायगड हा झपाट्याने औद्योगिक विकास होत असलेला जिल्हा आहे, परंतु रायगड जिल्ह्यात रस्ते चांगले नसल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला म्हणावी तशी गती मिळालेली नव्हती. आता रायगड जिल्ह्यातील रस्ते विकासाला केंद्र सरकारने गती दिली आहे. जिल्ह्यात दहा हजार कोटींच्या रस्त्यांची कामे सध्या प्रगती पथावर आहे. या अंतर्गत १३ प्रमुख रस्त्यांचा विकास केला जात आहे.

रायगड जिल्ह्यात पूर्वी १५४ किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग होते. यात ३४८ किलोमीटर लांबीच्या नवीन मार्गांचा समावेश करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात भविष्यात रस्त्यांचे जाळे निर्माण होणार आहे. त्यामुळे आगामी काळात रायगडच्या विकासलादेखील गती मिळणार आहे.

केंद्र सरकारने सध्या देशातील रस्ते विकासाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातदेखील रस्त्यांची कामे वेगाने होत आहेत. त्याला रायगड जिल्हादेखील याला अपवाद ठरलेला नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात रस्ते विकासाचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यात आता ५०३ किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग झाले आहेत. यात पेण ते खोपोली, महाड ते रायगड किल्ला, वडखळ ते अलिबाग, दिघी ते माणगाव, इंदापूर ते माणगाव, पाली खोपोली आणि पुणे ताम्हाणी घाटमार्गे माणगाव रस्त्याचा समावेश आहे. नवी मुंबई प्रस्तावित विमानतळाला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची कामेही जोमाने सुरू आहेत. जेएनपीएला जोडणाऱ्या रस्त्यांचाही विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यांचे जाळे आणखी विस्तारत आहे.

बहुप्रतिक्षीत रेवस -रेड्डी सागरी राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती मिळाली आहे. रेवस ते रेड्डी सागरी मार्गासाठी नऊ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एमएसआरडीसीच्या माध्यमातून हा रस्ता केला जाणार असून रस्त्याच्या सुधारीत आराखड्यालाही मंजुरी देण्यात आली आहे. या मार्गावरील रेवस -करंजा पूल गेली अनेक वर्षे रखडला आहे. आता राज्य सरकारच्या माध्यमातून ८५० कोटींच्या रेवस -करंजा पुलाची निविदा मागविण्यात आली आहे.


याशिवाय दृतगती महामार्गाच्या धर्तीवर मुंबई ते गोवा ग्रिनफिल्ड एक्सप्रेस महामार्ग उभारण्याचे राज्यसरकारने निश्चित केले आहे. या महामार्गामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून काही तासांत गोव्याला पोहोचता येणार आहे. अलिबाग विरार मल्टिमॉडेल कॉरिडोरसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या कानउघणनंतर आता मुंबई- गोवा महामार्गाचे पळस्पे ते इंदापूर आणि इंदापूर ते कशेडी महामार्गाचे चौपदरीकरणाच्या कामाने वेग घेतला आहे. यातील पळस्पे ते इंदापूर या रखडलेल्या कामाला गती देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या टप्प्याचेदेखील काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्याला अनुमती दिली आहे. इंदापूर ते कशेडी मार्गातील वीर ते भोगाव आणि भोगाव ते खवटी मार्गातील कामे येत्या काही महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. इंदापूर ते वडपाले टप्प्यातील काम काही अडचणीमुळे रेंगाळले आहे. या अडचणीदेखील दूर होणार आहेत. त्यामुळे गेली १२ वर्षे रखडलेल्या मुंबई -गोवा महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम पूर्ण होईल, या मार्गावरील वाहतुकीचा वेग वाढेल.

राज्यातील औद्योगिक जिल्हा अशी रायगडची ओळख आहे. अनेक मोठमोठाले प्रकल्प या जिल्ह्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यात भविष्यात मोठ्या प्रमणावर गुंतवणूक केली जाणार आहे. पनवेल येथे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. रायगड जिल्ह्यात केवळ औद्योगिक प्रगती होते असे नाही तर या जिल्ह्यात पर्यटन विकासालादेखील वाव आहे.

पूर्वी मुंबई -गोवा व मुंबई-पुणे हेच दोन महामार्ग रायगड जिल्ह्यातून जात होते. मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग आल्यामुळे उत्तर रायगडातील गुंतवणूक वाढली. कोकणात जाण्यासाठी केवळ मुंबई -गोवा महामार्ग हाच एकवेम पर्याय होता. आता या महामार्गाचे चौपदीकरण होत आहे. शिवय त्याला पर्याय म्हणून रेवस -रेड्डी सागरी महामार्ग व त्यामुळे सर्व रस्ते विकासाचीही सर्व कामे लवकर मार्गी लागली तर विकासाला चालना मिळणार आहे. मुंबई ते गोवा ग्रिनफिल्ड एक्सप्रेस महामार्ग उभारण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात महामार्गांचे जाळेच तयार होणार आहे.

रायगड जिल्हा सागरी मार्गाने जोडला गेला आहे. या जिल्ह्यातून रेल्वे जाते. आत या जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. त्याबरोबर रस्त्यांचे जाळेदेखील तयार केले जात आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या विकासालादेखील वेग येणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### ॲमेझॉनच्या समर सेलमध्ये बंपर डिस्काउंट

ॲमेझॉन समर सेलला सुरुवात झाली असून, या सेलमध्ये ॲमेझॉन बेसिक्सच्या शानदार नॉन इन्व्हर्टर एसी निम्म्या किंमतीत खरेदी करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावर आकर्षक ऑफर्सचा फायदा मिळेल. विशेषतः हा एसी अपण ईएमआयवर खरेदी करू शकतो.

ई-कॉमर्स वेबसाइट ॲमेझॉनवर समर सेलचे आयोजन करण्यात आले आहे. या सेलमध्ये अनेक प्रोडक्ट्सवर बंपर डिस्काउंट दिले जात आहे.

ॲमेझॉनच्या या सेलमध्ये तुम्ही केवळ स्मार्टफोन, लॅपटॉपच नाही, तर टीव्ही, रेफ्रिजरेटर आणि एअर कंडिशनरदेखील खूपच कमी किंमतीत खरेदी करू शकता. या सेलमध्ये एसीवर फ्लॅट डिस्काउंट, बँक ऑफर्ससह अनेक ऑफर्सचा फायदा मिळत आहे. सेलमध्ये ॲमेझॉन बेसिक्सचा एक शानदार एसी स्वस्तात उपलब्ध आहे.

**ॲमेझॉन बेसिक्सच्या एसीवर बंपर डिस्काउंट**

ॲमेझॉन समर सेलमध्ये आयसीआयसीआय बँक, कोटक बँक आणि आरबीएल बँक कार्डचा वापर केल्यास १० टक्के डिस्काउंटचा फायदा मिळेल. सेलमध्ये अनेक कंपन्यांचे शानदार एसी उपलब्ध आहेत. ॲमेझॉन बेसिक्स ३ स्टार रेटिंगसह येणाऱ्या एसीवर देखील आकर्षक ऑफर्सचा फायदा मिळत आहे. याची क्षमता एक टन असून, हा नॉन इन्व्हर्टर स्प्लीट एसी आहे. हा एसी २२,४९९ रुपये किंमतीत उपलब्ध आहे. या एसीची मूळ किंमत ३५,३५० रुपये आहे, परंतु, यावर १२,८५० रुपयांपर्यंत फ्लॅट डिस्काउंट दिले जात आहे. एसीला तुम्ही ईएमआयवर देखील खरेदी करू शकता. दरमहिना १,०५९ रुपये देऊन एसी खरेदी करता येईल. याशिवाय, ४,२३० रुपयांपर्यंत एक्सचेंज ऑफरचादेखील फायदा मिळेल.

**ॲमेझॉन बेसिक्स नॉन इन्व्हर्टर स्प्लीट एसीची वैशिष्ट्ये**

या एसीची क्षमता एक टन आहे. हा ३ स्टार रेटिंगसह येणारा एसी आहे व विजेची मोठी बचत होते. याचा कंडेन्सर १०० टक्के कॉपरने बनलेला आहे. यावर प्रोडक्टसह एक वर्षाची वॉरंटी दिली जात आहे. सोबतच, कंप्रेसर पाच वर्षांची वॉरंटी मिळते. हा एसी अँटीबॅक्टेरियरल कोटिंगसह येतो. यामध्ये एअर प्यूरिफायर, डस्ट फिल्टर आणि डीह्यूमीडिफायर दिला आहे. तुम्ही जर नवीन एसी खरेदी करण्याचा विचार करत असाल तर हा एसी एक चांगला पर्याय आहे. ॲमेझॉन समर सेलमध्ये आकर्षक ऑफर्ससह खरेदी करू शकता. हा एसी अपण ईएमआयवर खरेदी करू शकतो.

# शिक्षणप्रसारक राजर्षी शाहू महाराज

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक भारतीय समाजसुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती (इ. स. १८८४-१९२२ दरम्यान) होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी प्रयत्न केले. महाराजांना 'राजर्षी' ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमत्त त्यांच्या कार्याचा घेतलेला धांडोळा...

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व 'शाहू' हे नाव ठेवले. १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी



बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. त्या वेळी त्यांचे वय १७ आणि लक्ष्मीबाईंचे वय १२ वर्षांहून कमी होते. १२ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा

**निमित्त**

प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन रयत असोसिएशन ही संस्था स्थापन केली. शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.

शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्या दृष्टीने अस्पृशांना आर्थिक मदतही केली.

गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून त्यांची ओळख होती. सामाजिक समता, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य आदी क्षेत्रामध्ये त्यांनी अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.

**शैक्षणिक कार्य**

महाराजांनी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पुरोहित शाळा, युवराज, सरदार शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा, सैनिक शाळा, बालवीर शाळा, डोंबारी मुलांची शाळा, कला शाळा अशा विविध शाळांची उभारणी केली.

**-साभार विकिपीडीया**

**क्लिक...क्लिक...!**



**महाड : दुपारच्या तळपत्या उन्हात आपले काम आटपून माऊली आपल्या लेकरांना आनंदाने घास भरवतानाचा क्षण टीपला आहे प्रितम सकपाळ यांनी.**

## आरोग्य प्रहर



### योग्य आहाराने करा अस्थमा नियंत्रण शक्य

आहारात थोडा बदल केल्यास अस्थमाचा त्रास कमी होऊ शकतो. ताज्या, पौष्टिक अन्नामुळे आपले आरोग्य तर चांगले राहतेच, त्यामुळे अस्थमाही नियंत्रणात राहतो. अन्नातील विशिष्ट प्रथिनांबाबत जेव्हा आपली रोगप्रतिकारक यंत्रणा अतिरिक्त प्रतिसाद देते तेव्हा अन्नापासून ॲलर्जी आणि त्रास सुरू होतो. काही जणांमध्ये यामुळे अस्थमाचा त्रासही सुरू होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते अस्थमा प्रतिबंधासाठी विशिष्ट आहार जरी नसला तरी काही अन्नपदार्थामुळे फुप्फुसांच्या क्षमतेत सुधारणा होते.

**'ड' जीवनसत्त्व :** सहा ते १५ वर्षे वयोगटातील बालकांसाठी पुरेसे ड जीवनसत्त्व मिळाल्यास अस्थमाचे झटके कमी होण्यास मदत होते. अंडी, संत्र्यांचा रस, साल्मन मासे, दुधातून ड जीवनसत्त्व मिळते. जर दुध आणि अंड्यांची ॲलर्जी असल्यास ते टाळावेत.

**'अ' जीवनसत्त्व :** अ जीवनसत्त्वाचे प्रमाण अस्थमाग्रस्त मुलांच्या रक्तात पुरेसे नसते. अ जीवनसत्त्व पुरेशा प्रमाणात वाढवले तर फुप्फुसांची क्षमता वाढण्यास मदत होते. खरबूज, पालेभाज्या, गाजर, ब्रोकोली आणि रताळ्यातून हे जीवनसत्त्व मिळते.

**फळे :** रोज एक सफरचंद खाल्ल्यास अस्थमा प्रतिबंध होऊ शकतो. सफरचंदामुळे फुप्फुसांची क्षमता वाढून, अस्थमाच्या झटक्यांचा धोका कमी होतो. केळी खाल्ल्याने अस्थमाग्रस्त बालके श्वासोच्छवास नीट करू शकतात. या फळांतील पोटॅशियम आणि अशुद्धी दूर करणाऱ्या घटकांमुळे हे होते.

**मॅग्नेशियम :** मॅग्नेशियमचे कमी प्रमाण असल्यास फुप्फुसांची क्षमता कमी होते. भोपळ्यांच्या बिया, साल्मन मासे, डार्क चॉकलेट, स्पिनाच आदी पदार्थात मॅग्नेशियम असते. त्यांच्या सेवनाने मॅग्नेशियम स्तर वाढतो व अस्थमा नियंत्रणात राहतो. अस्थमा नियंत्रणासाठी काही अन्नपदार्थ टाळणेही गरजेचे आहे. लोणची, बाटलीबंद लिंबू व लिंबू पाणी, कोळंबी, वाईनमध्ये सल्फाईट वापरले जाते. अस्थमा रुग्णांनी हे पदार्थ टाळावेत. चहा, कॉफीत आढळणाऱ्या 'सिलिकिलेट्स' या रासायनिक घटकांमुळे अस्थमाच्या अनेक रुग्णांना त्रास होतो. यामुळे काही अस्थमा रुग्णांना ॲलर्जीचा त्रास होतो. त्यामुळे असे अन्नपदार्थ त्यांनी टाळावेत.

# ठेकेदार अफ़कॉन कंपनीच्या अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करा

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात डोंगर पोखरण्यासाठी भूसुरुंग लावल्याने ढेकू गावात मोठे दगड गोटे पडल्याने, अनेक घरांचे नुकसान झाले. त्यामुळे ग्रामस्थ आक्रमक झाले. त्यांनी गुरुवारी (दि. ५) ठेकेदार अफकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

खंडाळा घाटात डोंगर पोखरण्यासाठी अफकॉन कंपनीने बुधवारी केलेल्या भूसुरुंग स्फोटाने उडालेले दगड ढेकू गावातील अनेक घरांवर पडल्याने नुकसान झाले होते. विशेष म्हणजे गावात

## घरांचे नुकसान झाल्याने ढेकू ग्रामस्थांची मागणी


(छाया : विनायक माडे)

लग्न असल्याने सर्व ग्रामस्थ लग्न मंडपात उपस्थित होते, अन्यथा जीवितहानी झाली असती, असा मुद्दा पोलीस ठाण्यात चर्चेच्या दरम्यान माजी जिप सदस्य नरेश पाटील यांनी उपस्थित केला. असा प्रकार अनेक वेळा झाला असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

पोलीस निरीक्षक पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरत, निष्काळजीपणाचा ठपका ठेवत गुन्हा दाखल करणार असल्याचे ठणकावून सांगितल्यानंतर, उपस्थित कंपनीचे अधिकारी हादरून गेले.

संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा व ज्या ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे, त्यांना तातडीने भरपाई देण्याची आग्रही मागणी या वेळी झालेल्या बैठकीत केली.

खोपोली पोलीस ठाण्यात झालेल्या या बैठकीला सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश कळसेकर, साजगाव ग्रामपंचायत सदस्य अजित देशमुख यांच्यासह ढेकू ग्रामस्थ आणि अफकॉन कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.



# ऑनलाइन व्यवहारात सावधानता गरजेची –विपिनकुमार पांडे

## पेण येथील ग्राहक मेळाव्यातून एसबीआयची जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

ग्राहकांनी ऑनलाइन खरेदी व्यवहार करताना सावध रहावे, असे आवाहन स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) चे उपमहाव्यवस्थापक विपिनकुमार पांडे यांनी पेण येथे केले.

आझादी का अमृत महोत्सवानिमित्त एसबीआयतर्फे पेण येथे ग्राहक मेळावा झाला. त्यात विपिनकुमार पांडे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. सध्या ऑनलाइन व्यवहार मोठ्या प्रमाणात केले जात आहेत मात्र त्यामुळे सायबर क्राईम वाढत असल्याचे पांडे यांनी या वेळी सांगितले. बोगस फोन, मेसेज, मेल अपडेटसचे मेसेज येतात, ते डाऊनलोड करु नका. वैयक्तिक माहिती देऊ नका. युनो ॲप, क्युआर कोड पाठवला जातो, त्याबाबतीत सावध रहा. काही वेळा पैशाची मागणी केली जाते, स्वीकारु नका. मॉल व इतर ठिकाणी मोबाईल चार्जिंग करु नका. लॉटरी लागली सांगून फसवणूक केली जाते त्याबाबत सतर्क रहा, अशा सूचना विपिनकुमार पांडे यांनी केल्या.

नोकरीला लावतो सांगून क्रेडिट कार्डने पैसे भरा सांगितले जाते, त्यापासून सावध रहा. पैशाची देवाण घेवाण करताना काळजी घ्या. आपल्या एटीएमचा पिन लिहू नका, सांगू नका, गोपनीय ठेवा. अधिक माहितीसाठी बँकेच्या टोल क्रमांक १८००१२३४ या नंबरवर संपर्क साधा, असे आवाहन एसबीआयचे प्रादेशीक व्यवस्थापक कुमार परिमल प्रेम यांनी या वेळी केले. या मेळाव्यात ग्राहक व व्यापाऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. त्यावर चर्चा करण्यात आली. पेण शाखा व्यवस्थापक प्रविणकुमार सिंग यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

---

# रोह्यात सणांनिमित्त कविता वाचनाचा कार्यक्रम

**रोहे प्रतिनिधी**

परशुराम जयंती व अक्षय्य तृतीयेचे औचित्य साधून ब्राह्मण मंडळातर्फे रोहा शहरातील ओंकारेश्वर मंदिरात साहित्यिका मानसी चेतन चापेकर यांचा कविता वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मानसी चापेकर यांनी या वेळी आपल्या कविता प्रभावीपणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री परशुरामांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी मंडळाच्या नवीन माईक सिस्टीमचेदेखील उद्घाटन करण्यात आले.


(छाया : महादेव सरसंबे)

ब्राह्मण मंडळाचे उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, सहसचिव मकरंद गोविलकर, खजिनदार चैतन्य आठवले, कार्यकारिणी सदस्य प्रकाश कुंटे, श्रीनिवास रिसबुड, उदय गोखले आदींसह समाजबांधवांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# भडवळ टाकाचीवाडीमधील ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील दामत-भडवळ ग्रामपंचायत हद्दीमधील टाकाचीवाडी येथील आदिवासी लोकांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण सुरु आहे. ग्रामपंचायतीकडून येणारी जलवाहिनी वारंवार तोडून टाकण्यात येत असल्याने येथील ग्रामस्थांना सव्वा किलोमीटर अंतरावर जाऊन डोक्यावर पाण्याने भरलेले हांडे आणावे लागत आहेत.

दामत-भडवळ ग्रामपंचायत हद्दीतील भडवळ टाकाचीवाडीमध्ये ८५ घरांची वस्ती असून तेथे तीन विहिरी आहेत, त्यापैकी एका विहिरीचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. तर अन्य दोन विहिरी जानेवारी महिन्यात

(छाया : संतोष पेरणे)


कोरड्या पडतात. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेचे पाणी विहिरीत सोडून ग्रामस्थांची तहान भागविली जाते मात्र भडवळ गावातून येणारी जलवाहिनी आणि तेथील व्हॉल्व्हदेखील वारंवार तोडण्यात येत असल्याने टाकाचीवाडीमधील विहिरीपर्यंत पाणी पोहचत नाही. ज्या भागात जलविहिनी तोडतात त्या ठिकाणी आदिवासी ग्रामस्थ थांबून राहतात. त्यावेळी नळाद्वारे विहिरीत पाणी पोहचते, पण ते गढूळ येते. त्यात दोन्ही विहिरीत चार, आठ दिवसांनी कधीतरी पाणी येत असल्याने आदिवासी ग्रामस्थ हैराण झाले आहेत.

पिण्याच्या पाण्यासाठी जानेवारी महिन्यापासून सुरु असलेली भडवळ टाकाचीवाडी ग्रामस्थांची धावपळ आता कडक उन्हातदेखील सुरु आहे. अतिवृष्टीमध्ये तुटलेल्या विहिरीमध्ये आदिवासी लोकांनी डवरे खोदले असून, त्या विहिरीत उतरून आदिवासी ग्रामस्थ घरात वापरण्यासाठी पाणी गोळा करून आणतात. तर तेथील महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी सव्वा किलोमीटर अंतरावरील एक फार्महाऊस गाठावे लागते. या फार्महाऊसमधील बोअरवेलचे पाणी नंबर लावून घरी आणावे लागते.

कडक उन्हात डांबरी रस्त्यावर चटके सहन करीत आदिवासी महिलांना डोक्यावर हांडे आणावे लागत असल्याने सर्व ग्रामस्थांच्या मनात संताप निर्माण झाला आहे. भडवळ टाकाचीवाडीसाठी स्वतंत्र नळपाणी योजना अस्तित्वात आणण्याची ग्रामस्थांची मागणी आहे.

---

# नागोठण्यात डॉ. आंबेडकर जयंती महोत्सव

**पाली : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती नागोठण्यात उत्साही व आनंददायी वातावरणात साजरी करण्यात आली. या वेळी नागोठणे शहरातून महापुरुषांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली होती. मुस्लीम बांधवांकडून या मिरवणुकीचे जोरदार स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी व घोषणांच्या गजरात मुस्लीम बांधवांनी महामानवाला अभिवादन केले. तसेच सरबत वाटप केले.

या वेळी व्ही. के. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष चंद्रकांत गायकवाड यांनी केले. सामाजिक

## मुस्लीम बांधवांकडून मिरवणुकीचे स्वागत


(छाया : धम्मशील सावंत)

प्रबोधनकार रोशन पाटील यांचे व्याख्यान झाले. राजिपचे माजी सदस्य किशोर जैन यांनी मनोगत व्यक्त केले. गायक राजू बागूल (मुंबई), आणि प्रसिद्ध गायिका राखी चौरे (पुणे) यांचा भिमगीतांचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी प्रभाकर ओव्हाळ यांनी केले. रोहा पं. स. चे माजी सदस्य बिलाल कुरेशी, नागोठण्याचे उपसरपंच मोहन नागोठणेकर, माजी सरपंच विलास चौलकर, राजेश्री दाभाडे, लियाकत कडवेकर, ग्रामपंचायत सदस्य रूपाली कांबळे, हभप महेश पोंगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते दिलीप टक्के, धनंजय जगताप, बाळासाहेब टक्के, किर्तीकुमार कळस, बाळू रटाटे, सिराज पानसरे, मुजफ्फर कडवेकर, अजगर सय्यद, आसिफ मुल्ला, तसवुर अधिकारी वरवठणे ग्रामपंचायत सरपंच ऋतुजा म्हात्रे, ग्रामस्थ उपस्थित होते.

भीमजयंती उत्सव कमिटी अध्यक्ष संतोष गायकवाड, उपाध्यक्ष पांडुरंग गायकवाड, सेक्रेटरी विजय शिर्के, कोषाध्यक्ष दीपक दाभाडे, सहसेक्रेटरी अल्पेश शेलार, सहकोषाध्यक्ष सुदिन शिर्के यांच्यासह भिमानुयायी, धम्मबांधव आदींनी सदर महोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. प्रकाश कांबळे यांनी आभार मानले.

# पोलादपूरमध्ये ईद उत्साहात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुस्लीम वस्त्यांमध्ये मंगळवारी (दि. ३)सामाजिक एकोपा दर्शवित रमजान ईद साजरी करण्यात आली. पोलादपूर शहरात सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी हिंदू-मुस्लीम एकतेचे दर्शन घडविले.

भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका अंकिता जांभळेकर निकम यांनी खारकांड मोहल्ल्यामध्ये मुस्लीम बांधवांसोबत रमजान ईद साजरी केली. या वेळी अंकिता जांभळेकर -निकम यांच्या वतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. भाजप शहराध्यक्ष राजा दिक्षित, युवा मोर्चा रायगड जिल्हा चिटणीस महेश निकम, प्रतिक सुर्वे, राजेश जांभळेकर, आमु पठाण, अनिकेत जांभळेकर आदी


(छाया : शैलेश पालकर)

या वेळी उपस्थित होते.

पोलादपूर नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले, नगरसेवक दिलीप भागवत, नगरसेवक संतोष चव्हाण तसेच महमद मुजावर, महमद धामणकर, मुन्ना मुजावर, मुश्ताक मुजावर, अमोल भुवड आदी सर्वपक्षीय नेत्यांनी पोलादपूर एसटी स्थानकाजवळील जामा मशिदीमध्ये जाऊन मुस्लीम बांधवांसमवेत खीरकुर्माचा स्वाद घेतला. या वेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक प्रशांत जाधव, गुप्तवार्ता पोलीस इकबाल शेख तसेच पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड सुनील जगताप आदी उपस्थित होते.

---



# चौक येथे ज्योती देवळे यांचा सेवापूर्ती सोहळा

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका ज्योती लिलाधर देवळे या नियत वयोमानानुसार ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा विद्यालयामध्ये पार पडला.

संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश देशमुख व संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांनी संस्थेच्या वतीने ज्योती देवळे यांचा शाल, श्रीफळ, साडीचोळी देऊन सत्कार केला. यशवंतराव देशमुख स्मृती समितीच्या वतीने निता उदय देशमुख व उदय देशमुख यांनीही ज्योती देवळे यांचा सत्कार केला. शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, सारंग विद्यामंदिरच्या वतीने पंडित पाटील, प्राथमिक विद्यामंदिरच्या वतीने सुलभा गायकवाड व देवानंद कांबळे, माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या वतीने पाटील तर सावित्रीबाई फुले महिला बचत गटाच्या वतीने कुंभार मॅडम यांनी ज्योती देवळे व लिलाधर देवळे यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद कुंभार यांनी केले. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, राजू कापरेकर, राजन चौधरी यांच्यासह देवळे मॅडम यांचे नातेवाईक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते. वरुडे सर यांनी आभार मानले.

# पेणचे नायब तहसीलदार शशिकांत वाघमारे सेवानिवृत्त

**पेण : प्रतिनिधी**

येथील प्रांत कार्यालयात नायब तहसीलदार पदावर काम करणारे शशिकांत वाघमारे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम प्रांत कार्यालयात घेण्यात आला होता.

यावेळी प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी शशिकांत वाघमारे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पेणच्या तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, नायब तहसीलदार सुनील जाधव, प्रसाद कालेकर, अशोक गोंधळी, पालघरचे माजी अधिकारी श्रीधर मोकल, औरंगाबाद अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी ताटे, मुंबई कुटुंब न्यायालयाचे सोनावणे यांच्यासह विविध खात्यांतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

(छाया : अनिस मनियार)


# चौकमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करण्यात आला. या वेळी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक रमेश गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, राजन चौधरी, शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, उपमुख्याध्यापिका कांता पुजारी, पर्यवेक्षक दिलीप म ळीक, प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

संदर्भ :- कुबनप/साबां/३६८७/२०२२-२३ दि. ०५/०५/२०२२.

**जाहीर निविदा सूचना क्र. २०/२०२२-२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत विविध ०२ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | कुबनप क्षेत्रातील गौरी हॉल कोविड सेंटरची अंतर्गत रंगरंगोटी करणे. | ९,७५,१४६/- |
| २ | कुबनप क्षेत्रातील गौरी हॉल कोविड सेंटरची दुरुस्ती करून नुतनीकरण करणे. | ९,९५,५६९/- |

सदर निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०६/०५/२०२२ ते दि. १३/०५/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. व सदर निविदा शक्य झाल्यास दि. १७/०५/२०२२ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/
(योगेश गोडसे)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

# ऑनलाईन आरटीआय पोर्टल काही अधिकाऱ्यांमुळेच होतेय बदनाम!

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतासारख्या लोकशाही अवलंबणाऱ्या देशात माहिती अधिकार कायद्याने अधिक पारदर्शकता आणली आहे. या कायद्याने सरकारी कारभारावर अंकुश आणला आहे. शासनाचे ऑनलाईन पोर्टल आहे. त्यावर सातत्याने माहिती अधिकारात माहिती मागवली जाते. मात्र मागवलेल्या माहितीला व आपिलात गेल्यावरही अधिकारी माहिती देत नसल्याने हे अधिकारीच या प्रणालीला सदोष बनवत असल्याचे दिसून येत आहेत. याबाबत नवी मुंबईतील माहिती अधिकार कार्यकर्ते सुधीर दाणी यांना अनुभव आला असून त्यांनी शासनाला हे पोर्टल अधिक सुटसुटीत व लोकाभिमुख करण्यासाठी निवेदन दिले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे, ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून औरंगाबाद पालिकेकडे माहिती मागवली होती. मात्र त्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील केले, त्यालादेखील कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. ऑनलाईन पोर्टलवर दिलेल्या नंबर वर फोन करून देखील काहीच उपयोग होत नसल्याचा काहींचा अनुभव आहे. या ऑनलाईन पोर्टलवर नमूद असणाऱ्या संपर्क मेलवर मेल केल्यानंतर देखील कुठलाच प्रतिसाद प्राप्त होत नाही.

माहिती अधिकार कायद्याचा उद्देश हा प्रशासन अधिकाधिक पारदर्शक, लोकाभिमुख व्हायला हवे असताना तो अधिकार्यांकडूनच फोल ठरवला जात आहे. ऑनलाईन आरटीआय पोर्टलच सदोष असल्याने प्रशासकीय व्यवस्था त्याचा गैरफायदा उठवत माहिती अधिकार अर्जाला केराची टोपली दाखवताना दिसतात. माहिती अधिकार दाखल करणाऱ्यालाच केवळ गरज आहे अशा प्रकारे जर अर्जाला प्रतिसाद मिळाला नाही तर त्याने प्रथम अपील करायचे त्याला देखील प्रतिसाद मिळाला नाही तर राज्य माहिती आयुक्तांकडे अर्ज करायचा असा नियम आहे. त्यांच्याकडे इतके अर्ज प्रलंबित असतात की, सुनावणी होण्यासाठी ४/५ महिन्यांचा कालावधी लागतो आहे. या मुळे प्रशासकीय व्यवस्था माहिती अधिकार अर्जाला उत्तर देण्यास बांधील नाहीत का? त्यांचे उत्तरदायित्व नाही का? भारतात लोकशाही व्यवस्था आहे तर मग नागरिकांच्या हक्काचे उल्लंघन करणाऱ्याला काहीच शिक्षा का नाही? तसेच प्रशासकीय कामात अडथळा आणला म्हणून नागरिकांवर कारवाई होवू शकते असे अनेक प्रश्न दाणी यांनी या निवेदनात नमुद केले आहेत.

## ई मेल्सला देखील उत्तर नसल्याची नाराजी

### आरटीआय रजिस्टर असणे गरजेचे

*प्रत्येक कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने येणाऱ्या अर्जाच्या बाबतीत देखील आरटीआय रजिस्टर असणे सक्तीचे करावे व त्यात अर्ज येण्याची तारीख, अर्जाला उत्तर देण्याची तारीख, अर्जास प्रथम अपिल, पुढे माहिती आयुक्तांकडे गरज पडल्यास त्याचा देखील तपशील नोंद ठेवण्याची प्रथा सुरु करायला हवी. त्या त्या अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात प्राप्त अर्ज, प्रतिसाद दिले गेलेले अर्ज, प्रतिसाद न दिलेले अर्ज याचा तपशील गोपनीय अहवालात नोंदवला जायला हवा. या पध्दतीने केले तरच प्रशासनाला माहिती अधिकाराचा धाक निर्माण होऊ शकेल आणि नागरिकांना त्यांची उत्तरे वेळेत मिळतील.*

### माहिती जनतेसाठी उपलब्ध करा

सदरील ऑनलाईन पोर्टल लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अधिकाधिक उत्तरदायी असायला हवी. नागरिकाने केलेल्या आरटीआय अर्जाला उत्तर दिले नाही तर तो अर्ज विहीत कालावधी नंतर आपसूकच प्रथम अपील म्हणून प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे वर्ग व्हायला हवा. तसेच प्रथम अपीलला देखील प्रतिसाद दिला गेला नाही तर तो राज्य माहिती आयुक्तांकडे वर्ग व्हायला हवा. सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, वस्तुतः लोकशाही व्यवस्थेत माहिती स्वतःहुन प्रशासनाने जनतेसाठी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

### असेही करायला हवे

सदरील ऑनलाईन प्रणाली तंत्रज्ञानाचा वापर करत अधिकाधिक परिपूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न केले जायला हवेत. ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून किती अर्ज आले, किती अर्जाला उत्तर दिले, ते विहित कालावधीत दिले किंवा नाही या सर्वांचा तपशील या ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध असायला हवा. संबंधित अधिकाऱ्याने आरटीआयला उत्तर न दिले तर त्याची नोंद संलग्न अधिकाऱ्याच्या 'गोपनीय अहवालात ' नोंद केली जायला हवी.

### येणाऱ्या मेल्सला उत्तर नाहीच

मेल्स बाबतदेखील प्रशासनास उत्तरदायी बनवणे गरजेचे आहे. काही कार्यालयात मेल केल्यानंतर उत्तरच मिळत नाही, असेही निवेदनात आहे.






भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी बुधवारी पनवेल तालुका व शहर कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, तालुका उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, नगरसेवक नितीन पाटील आदी. (छाया: लक्ष्मण ठाकूर)



पनवेल : पालीदेवद (सुकापूर) ग्रा.पं.चे माजी उपसरपंच व भाजपचे ज्येष्ठ नेते बुवाशेठ भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना राजिपचे सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भुपेद्र पाटील, सोशल मिडिया सेल तालुका अध्यक्ष राजेश पाटील, सुकापुरचे उपसरपंच दिवेश बुवाशेठ भगत, भाजप युवा नेते यतीन पाटील, संजय पाटील, प्रमोद भगत, दीपक बुवाशेठ भगत आदी उपस्थित होते.

# ट्रेकर ६० फूट दरीत कोसळला



दैव बलवत्तर म्हणून बचावला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील चंदेरी किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेला एक ट्रेकर ६० फूट खोल दरीत पडल्याची घटना बुधवारी (दि. ४) घडली. मात्र, फक्त दैव बलवत्तर म्हणून हा ट्रेकर बचावला आहे.

वृत्त असे, पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश गुटाळ, पोलीस हवालदार ओंबासे, बदलापूर रेस्क्यू टीमचे नागेश साखरे व इतर तीन सदस्य यांनी शर्तीचे प्रयत्न करून ट्रेकर विराज संजय मस्के (२० रा. तुळाशेत पाडी, भांडुप याचे प्राण वाचवले आहेत. पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक तरुण चंदेरी किल्ल्यावरून पनवेलच्या बाजूला खोल दरीत पडल्याची खबर मिळाली. या घटनेची माहिती निसर्ग मित्र संस्थेला देऊन त्यांनाही मदतीसाठी आवाहन करण्यात आले. पो. ह. ओंबासे, रीटघरचे पोलीस पाटील दीपक पाटील, स्थानिक रहिवासी यांनी घटनास्थळी धाव घेत विराज मस्के यास दोरीच्या साहाय्याने दरीतून वर काढले. विराज मस्के व त्याचे सहा मित्र असे सात जण सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास चंदेरी किल्ल्याच्या जवळ पोहोचले. डोंगरावरील किल्ल्याच्या टोकाकडे जात- असताना विराज सर्वांच्या पुढे होता. या वेळी त्याचा पाय घसरून तोल गेला व किल्ल्यावरून तो साठ फूट खाली दरीत कोसळला. दरीत एका दगडाला जाऊन अडकला. या अपघातामध्ये त्याच्या डोक्याला, हातापायाला व कमरेला जबर मार लागला. विराजला चालता येत नसल्यामुळे त्याला स्ट्रेचरवर झोपवून रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी किल्ल्यावरून पायथ्याशी आणले. रात्र असल्याने जखमी विराजला घेऊन किल्ला उतरण्यास अनेक अडचणी येत होत्या. गुरूवारी सकाळी त्याला किल्ल्यावरुन खाली आणत रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# युक्रेनमधून परतलेल्या विद्यार्थ्यांनी; पालकांनी मांडल्या विविध समस्या!

## खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांची घेतली भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील युक्रेन वरून परतलेल्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी विविध समस्या मांडल्या. ठाणे जिल्हा कार्यालयात महाराष्ट्र भाजप आयटी प्रमुख सतिश निकम यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राज्यसभा खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नवी मुंबई सोशल मीडिया प्रमुख दिपक जगताप आणि नवी मुंबई मास मीडिया प्रमुख विनीत मोरे उपस्थित होते.

सध्याच्या परिस्थितीत शिक्षण सुरू ठेवण्याच्या या विद्यार्थ्यांच्या अडचणी कमी कराव्यात अशी विनंती यावेळी केली. नॅशनल मेडिकल कौन्सिल आणि पीएमओकडे त्यांचे प्रश्न मांडण्याची विनंती केली. सध्या युक्रेनमधील बहुतेक विद्यापीठे त्यांच्या मायदेशी परतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन व्याख्याने आयोजित करत आहेत. परंतु, विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलसाठी लॅबमध्ये प्रवेश नाही. शिष्टमंडळाने डॉ. सहस्त्रबुद्धे यांचे याकडे लक्ष वेधले.



# खोपटे येथे संतोषी माता मंदिरात मूर्तीचा प्राण प्रतिष्ठापना सोहळा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील खोपटे बांधपाडा येथे नव्याने बांधलेल्या संतोषी माता मंदिरात शुक्रवारी (दि. ६) सकाळी ८ मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उरण तालुक्याला धार्मिकतेचा वारसा असल्याने अनेक गावात विविध देवतांची मंदिरे उभारली गेली आहेत. त्यानुरूप खोपटे बांधपाडा येथे मोरेश्वर पाटील कुटुंबियांनी संतोषी माता मंदिर उभारले आहे. या सुंदर मंदिरात संतोषी मातेची मूर्ती विराजमान होणार आहे. शुक्रवारी सकाळी ८



वाजता मूर्तीचा महाभिषेक उरण तालुक्यातील दानशूर व्यक्तिमत्त्व शंकर तांडेल यांच्या उपस्थितीत होणार असून मंत्र जयघोषात मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या वेळी देवीची महाआरती होणार असून गोपाळकाका हरिपाठ मंडळाचा हरिपाठाचा सुश्राव्य कार्यक्रम होणार आहे. त्या नंतर रात्री आठ वाजता नवी मुंबईतील प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. एकनाथ पाटील महाराज यांचे कीर्तन होणार आहे. सकाळी आठ वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमात तीर्थप्रसाद व महाप्रसादाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. या अध्यात्मिक कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्याचे आवाहन मोरेश्वर पाटील यांच्या कुटुंबीयांनी केले आहे. दरम्यान कोरोना तिसरी लाट गेल्यानंतर धार्मिक स्थळे प्रवेशासाठी खुली करण्यात आली. या मुळे आता भाविक मोठ्या प्रमाणात जावून दर्शन घेत आहेत.

# आवक वाढूनही हापूसच भाव चढलेला

## दोनशे ते पाचशे रुपये प्रति डझन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अवकाळी पावसामुळे हापूस आंबा झाडावरून काढून बाजारात पाठविण्याचे प्रमाण मागील आठवड्यापासून मोठ्या प्रमाणात वाढले असल्याने तुर्भे येथील एपीएमसीच्या फळ बाजारात दररोज सत्तर हजारांपेक्षा जास्त हापूस आंबा विक्रीसाठी येत आहे. आवक वाढूनही हापूसचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरच आहेत. आकारानुसार हापूस आंबा कमीत कमी दोनशे ते पाचशे रुपये प्रति डझनने विकला जात आहे. तर एक आबा १५ ते १६ रुपये प्रति नग विकला जात आहे. बाजारात ज्या प्रमाणात आवक सुरू आहे, त्यावरून हापूसचा हंगामही या महिन्यात संपणार असल्याचे दिसून येत आहे.



कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांत अलीकडे अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे यंदा बागायतदारांनी झटपट हापूस आंबा उतरवून मुंबई, पुण्याच्या बाजारात पाठविला आहे. कोकण तसेच राज्यातील इतर भागांतून सध्या दिवसाला सत्तर हजारांपेक्षा जास्त हापूस आंब्याच्या पेट्या (एक पेटी चार ते पाच डझनाची) बाजारात विक्रीसाठी येत आहेत. मंगळवारी ही आवक ७८ हजार पेटय़ांची आहे. त्यामुळे घाऊक बाजारात आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे आवक वाढल्याने भाव कमी होतील अशी अपेक्षा होती पण आजही मध्यम आकाराचा हापूस आंबा दोनशे ते पाचशे रुपये प्रति डझन विकला जात आहे.

### वाहतूक खर्च वाढल्याने दर अधिक

हापूस आंब्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यात मोठ्या आकाराच्या फळाचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे काही फळे आतून खराबही निघत आहेत. अवकाळी पावसाच्या भीतीने हापूस आंबा बाजारात पाठविण्याची अहमिका वाढली आहे. मात्र वाहतूक खर्च वाढल्याने हापूस आंब्याचे दर चढे असल्याचे समजते.

# भेंडखळ येथे जोपासली सामाजिक बांधिलकी!

**उरण : वार्ताहर**

मरावे परी किर्तीरुपे उरावे या उक्तीप्रमाणे भेंडखळ येथील कै. लक्ष्मण रमण ठाकूर यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या कुटुंबियांतर्फे वृद्धाश्रमात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यात नेहमी सहभागी असणारे भेंडखळ गावचे सुपुत्र स्वर्गीय लक्ष्मण रमण ठाकूर यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ त्यांच्या परिवाराकडून त्यांचा वारसा जोपासत मदत व सामाजिक बांधिलकी म्हणून रेशन सामान पनवेल नेरे येथील वृद्धाश्रम, संगीता नितीन जोशी सामाजिक व विकास संस्था स्नेहकुंज आधार गृह येथे त्यांची मुलगी प्रियांशी ठाकुर यांच्या हस्ते नितीन जोशी व अल्लाउद्दीन शेख यांच्या हाती सुपूर्त करण्यात आले. कै. लक्ष्मण रमण ठाकूर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त एका छोट्याशा कार्याला सुरुवात केली. सोबत जरिमरी नवरात्रोत्सव मंडळ भेंडखळ व शिवप्रेमी ग्रुप भेंडखळ यांनीही योगदान दिले. एकूणच या कार्यक्रमात सर्वांनी सहभाग घेतला.



# मनसे पदाधिकाऱ्यांवर कारवाई

**उरण : वार्ताहर**

उरण पोलिसांनी मनसेच्या ५ पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई केली असल्याची माहिती उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली.

यामध्ये रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, मनसे वाहतूक महाराष्ट्र प्रदेश चिटणीस अल्पेश कडू, रायगड उपजिल्हा संघटक सतीश पाटील, उरण तालुका उपाध्यक्ष मंगेश वाजेकर, मनसेचे उरण तालुका संघटक रितेश सेनेचे पाटील यांना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली.

# नवी मुंबईत महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव

**नवी मुंबई: बातमीदार**

महात्मा बसवेश्वरांची मानवतावादी व सर्वसमावेशक विचारधारा समाजामध्ये रूजावे तथा नवीन पिढीला त्यांचे उदात्त विचार अवगत व्हावे यासाठी 'शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी' ही संस्था गेल्या २३ वर्षापासून दरवर्षी महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई शहरात मोठा मेळावा आयोजित करत असते. यावर्षी सुध्दा रविवारी दि. ८ मे रोजी सायं. ५ वा. वाशी, सेक्टर-९/ए येथील शिव विष्णू मंदिर सभागृहात भव्य कार्यक्रमांचे आयोजन केले गेले आहे. या कार्यक्रमास कर्नाटक येथील चित्तरगी मठाचे डॉ. बसवलिंग स्वामी यांची उपस्थिती लाभणार असून प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री श्री भगवंत खुबा उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर प्रसिध्द 'स्वर-संगम ग्रुप' आपली गायन कला लोकसंगीत व वचन संगीताच्या माध्यमातून सादर करणार आहेत.

# महाडजवळील भुयारी मार्गात कायम वाहतूक कोंडी

(छाया : महेश शिंदे)





**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अद्याप पूर्ण झाले नाही तरच महाड शहराजवळ असलेल्या भुयारी मार्गातील फुटपाथवर विक्रेते आणि खाजगी वाहनांनी तळ ठोकला असल्याने तेथे कायम वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीकडे स्थानिक पोलीस प्रशासन व महामार्ग बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

महाडजवळ नातेखिंड आणि चांभारखिंड या ठिकाणी दोन मोठे भुयारी मार्ग ठेवण्यात आले आहेत. मुंबई-गोवा महामार्ग अद्याप अपूर्ण असून महाडजवळ नातेखिंड ते हॉटेल विसावापर्यंत उंची वाढवून महामार्गाचे काम सुरु आहे. नातेखिंड या ठिकाणी किल्ले रायगडकडे आणि महाड शहरात जाण्यासाठी तर चांभारखिंड गावाजवळ महाड शहरातील प्रवेश मार्ग आहे. या दोन्ही ठिकाणी कायम वाहनांची वर्दळ असते. महाड एसटी स्थानकात येणाऱ्या बसेसदेखील चांभारखिंड येथील भुयारी मार्गाचाच वापर करणार आहेत. सध्या एसटी महामंडळाच्या रस्त्यावरून महाड शहराला प्रवेश मार्ग आहे.

नातेखिंड आणि चांभारखिंड या दोन्ही भुयारी मार्गावर खाद्य पदार्थ, भाजी, आणि फळ विक्रेते, मासळी विक्रेते, रिक्षा चालकांनी कब्जा केला आहे. यामुळे अवजड वाहने, शिवशाही बसेस आदी वाहने भुयारी मार्गातून तसेच सर्व्हिस मार्गावर काढताना मोठी वाहतूक कोंडी होत आहे. एका बाजूला विक्रेते तर दुसऱ्या बाजूला रिक्षा चालकांनी उभ्या केलेल्या रिक्षा, कामावर जाताना उभ्या केलेल्या दुचाकी यामुळे याठिकाणी मोठी अडचण निर्माण झाली आहे.

चांभारखिंड येथे महाड एसटी महामंडळाच्या रस्त्याच्या प्रवेशद्वारावर सध्या खाजगी प्रवासी वाहतूक करणारी खाजगी वाहने बिनदिक्कत उभी करून प्रवासी गोळा करण्याचे काम चालते. हीच अवस्था नातेखिंड येथील महाड-रायगड मार्गाची झाली आहे. या ठिकाणीदेखील भुयारी मार्गात दोन्ही बाजूला आरडा ओरड करणारे भाजी, फळ विक्रेते आणि खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी तळ ठोकला आहे. किल्ले रायगडाकडे जाणाऱ्या वाहनांना आणि किल्ले रायगडकडून महाड शहरात येणाऱ्या वाहनांना त्याचा त्रास होत आहे. या ठिकाणी महामार्गाचे काम सुरु आहे. महामार्ग कामासाठी आलेल्या वाहनांनादेखील याठिकाणी सामान उतरवताना अडचण निर्माण झाली आहे. महामार्ग पूर्ण होण्याआधीच विक्रेत्यांनी बस्तान बसवल्याने भविष्यात या ठिकाणी मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणारा आहे.

महाड शहराजवळ अद्याप मूळ महामार्ग सुरु झालेला नाही. यामुळे नाते खिंड येथून थेट नडगावपर्यंत अद्याप पर्यायी मार्गाचा वापर केला जात आहे. पर्यायी मार्गदेखील एकाच दिशेनेच सुरु असल्याने ये-जा करणारी वाहने एकाच पर्यायी मार्गावरून धावत आहेत. त्यातच अनेकवेळा विविध ठिकाणी महामार्ग ठेकेदार कंपनीकडून बदल केले जात आहेत. याचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.

### ▮ मच्छीची मागणी करतंय तरी कोण?

*मुंबई-गोवा महामार्गालगत महाड एसटी स्थानकाच्या रस्त्यावर यापूर्वी मासळी विक्रेते बसत होते. महाड शहरात मच्छी मार्केट असतानादेखील बाहेरून येणाऱ्या मासळी विक्रेत्यांनी कधी नगरपालिका हद्दीत, कधी एसटी स्थानकाचा रस्ता आणि आता भुयारी मार्गात बस्तान बसवले आहे. मासळी विक्रेत्यांना अधिकाऱ्यांचे, पोलिसांचे भय नसल्याने लोकांच्या त्रासाबाबत यांना काहीही देणेघेणे नाही. याबाबत बोलताना एका मासळी विक्रेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर हायवे डिपार्टमेंट अधिकारी इथे येवून फुकट मच्छी घेऊन जातात असे सांगितले. नक्की कोणत्या विभागाचे अधिकारी मच्छी घेवून नागरिकांच्या त्रासाला कारणीभूत ठरत आहेत याचा शोध घेवून कारवाई होणे गरजेचे आहे.*

(छाया : अनिस मनियार)



# वडखळजवळ तिहेरी अपघात, दोन दुचाकीस्वार ठार





**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ गावच्या हद्दीत गुरुवारी (दि. ५) सकाळी तीन वाहनांत अपघात होऊन दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला.

अभय अर्जुन पाटील (वय ३६, रा. हाशिवरे, अलिबाग) याने दिलेल्या फिर्यादीनुसार टेम्पो (एमएच-४६,बीबी-६९३९) वरील चालकाने (नाव माहित नाही) त्याचा बंद पडलेला आयशर टेम्पो मुबई-गोवा महामार्गावर वाहतुकीस अडथळा होईल, या पद्धतीने उभा करून ठेवला होता. आरोपी डंपर चालक मनिष रामबचन चौहान (रा. पेण) याने आपल्या ताब्यातील डंपर (एमएच-०६,बी डब्ल्यु-४०६५) हा भरधाव घेऊन जात असताना त्याला आयशर टेम्पो बंद असल्याचे एकदम जवळ आल्यावर लक्षात आल्याने त्याने अचानक ब्रेक दाबला. डंपर मागून येणारी स्कुटी (एमएच-०६,सीएफ -४३०४) चालक सनोबर फातिमा झहीर काझमी (वय २८, रा. रामवाडी, पेण) व मोटारसायकल (एमएच-०६,सीए-४६४२) चालक विनोद अरविंद सिह (रा. कोपडा, उत्तरप्रदेश ) या दोघांनी आपल्या गाड्या थांबविल्या असता त्यांच्या पाठीमागून येणारी मिनीबस (एमएच-४८,के-९०८४) चे चालक उमेश विठोबा गमरे (रा. कांदिवली, मुंबई) याचे नियंत्रण सुटल्याने मिनीबसने दोन्ही दुचाकीनां जोरदार धडक दिली. त्यामुळे दुचाकीस्वार सनोबर काझमी व विनोद सिंह डंपर व मिनीबस यांच्यामध्ये दबले गेले. त्यात ते गंभीर जखमी होऊन मरण पावले.

या प्रकरणी आयशर टेम्पो चालक (नाव माहीत नाही), डंपर चालक मनिष चौहान, मिनीबस चालक उमेश गमरे यांच्या विरोधात वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक अतुल मडके करीत आहेत.

# कार्लेखिंड-कनकेश्वरफाटा मार्गावर होतेय अज्ञातकडून मारहाण



(प्रातिनिधीक छायाचित्र)

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील कार्लेखिंड ते कनकेश्वर फाटा मार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांना गेले काही दिवस अज्ञातांकडून मारहाण होत असल्याची चर्चा आहे. काही ग्रामस्थांनी यास दुजोरादेखील दिला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी मात्र यास दुजोरा दिलेला नाही.

कार्लेखिंड ते कनकेश्वरफाटा मार्गावरुन प्रवास करताना अज्ञात व्यक्ती दुचाकीवरुन येत चाबुक किंवा लाकडाने पाठीमागून हल्ला करीत असल्याची चर्चा आहे. मापगाव, मुनवली, बहिरोळे, टाकादेवी आदी गावांतील नागरिकांना मारहाण झाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.स्थानिक, पर्यटक यांनी रात्रीच्यावेळी या मार्गावरुन प्रवास करू नये, असे आवाहन स्थानिक ग्रामस्थांनी केले आहे. या बाबत ग्रामस्थ पोलिसात तक्रार करणार आहेत.

# पांगळोली येथे गोठ्याला आग, चार जनावरे होरपळली, एकाचा मृत्यू

(छाया : शैलेश पालकर)





**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पांगळोली गावातील भूमिहीन शेतकऱ्याच्या गोठ्याला बुधवारी (दि. ४) दुपारनंतर अचानक आग लागून चार गुरे होरपळली. त्यापैकी एका बैलाचा मृत्यू झाला. पोलादपूर तहसीलदार दिप्ती देसाई यांच्या आदेशानुसार तातडीने पंचनामा करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील पांगळोली येथील लोकांची शेतजमिन तोंडी भाड्याने घेऊन कसणारे परशुराम दाजी उपाळे यांच्या कुटूंबियांची केवळ म्हशी, गायी या चार-पाच पाळीव जनावरांवरच उपजीविका अवलंबून होती. बुधवारी दुपारी ४ वाजल्यानंतर या गुरांच्या गोठ्यास अचानक आग लागली. या दुर्घटनेत ही जनावरे होरपळून गंभीर जखमी झाली आहेत. यापैकी एका बैलाचा मृत्यू झाला आहे.

# सुधीर नाझरे यांच्या शिवराज्याभिषेक संवादाने फोटोग्राफर भारावले



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील सुधीर नाझरे व इतर १२ छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन मुंबईत भरविण्यात आले आहे. या वेळी सुधीर नाझरे यांनी रायगड किल्ल्यावर होणाऱ्या शिवराज्याभिषेक फोटोग्राफी या विषयावर विशेष व्याख्यान दिले. नाझरे यांच्या शिवराज्याभिषेक संवादाने उपस्थित छायाचित्रकार भारावून गेले.

सुधीर नाझरे व इतर १२ छायाचित्रकारांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे मुंबईत महाराष्ट्र दिनी उद्‌घाटन झाले. बुधवारी (दि. ४) सुधीर नाझरे यांनी रायगड किल्ल्यावर तिथीप्रमाणे होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची फोटोग्राफी या विषयावर व्याख्यान होते. या वेळी त्यांनी रायगडवरील पावसाळी वातावरण तसेच उत्तम रिझल्ट मिळण्यासाठी कॅमेऱ्याचे उपलब्ध असणारे अँगल व मेनू यांचा कसा वापर करावा, याबाबतची विशेष माहिती उपस्थितांना दिली. शिवराज्याभिषेक सोहळ्याचे काढलेले विविध फोटो त्यांनी मोठ्या पडद्यावर दाखवून फोटोग्राफीमधील बारकावे समजावून सांगितले. व छायाचित्रकारांना उत्तम मार्गदर्शन केले. त्यामुळे उपस्थित छायाचित्रकार भारावून गेले. हे छायाचित्र प्रदर्शन ८ मेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

# स्व. अच्युत ठाकूर यांना शनिवारी सांगितिक आदरांजली

**अलिबाग : प्रतिनिधी**

गायक व संगीतकार स्व. अच्युत ठाकूर यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम शनिवारी (दि. ७) सायंकाळी ७ वाजता अलिबाग तालुक्यातील कोपर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात स्व. अच्युत ठाकूर यांना सांगितिक आदरांजली वाहण्यात येणार आहे. गायक नंदेश विठ्ठल उमप हे या कार्यक्रमास उपस्थित राहणर आहेत.

अलिबाग तालुक्यातील कोपर हे स्व. अच्युत ठाकूर यांचे मुळगाव. त्यांनी अनेक गाणी गायली आहेत तसेच संगीतबद्ध केली आहेत. चित्रपट गीतांना संगीत दिले आहे. महाराष्टाची लोकधारा फेम विठ्ठल उमप यांच्या बरोबर त्यांनी जांभूळ आख्यान, अनेक भावगीते, भक्तीगीते, भजने गायली तसेच संगीत दिले आहे. चिमणी पाखर, पैज लग्नाची या चित्रपटांना त्यांनी संगीत दिले आहे.

# पेणमधील मराठा समाज भवनाच्या पहिल्या मजल्याच्या कामाचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील मराठा समाज भवनाच्या तळमजल्याचे काम नुकताच पूर्ण झाले. त्यानंतर हे समाज मंदिर सामाजिक, धार्मिक अशा विविध कार्यक्रमांसाठी सुरू करण्यात आले आहे. या नियोजित समाज मंदिराच्या पहिल्या मजल्याच्या कामाचा शुभारंभ माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

सकल मराठा समाज रायगड जिल्हा अध्यक्ष विनोद साबळे आणि सुधागड तालुकाध्यक्ष गणपत सितापराव, रोहा तालुका अध्यक्ष प्रदीप देशमुख, खालापूर तालुकाध्यक्ष शशिकांत मोरे, पेण तालुका अध्यक्ष प्रदीप चव्हाण, पेण शहर अध्यक्ष प्रवीण बैकर, खोपोलीचे माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, माजी नगरसेवक राजू वारकर तसेच विशाल साजेकर, पी. टी. शिंदे, मयूर सावळे, शिवाजी मोरे, नाना पवार, सागर पवार, श्रीकांत जाधव, सचिन पवार, कमलाकर साळुंके, मनीष देशमुख, संतोष सावंत, विजय कदम, दशरथ येरुणकर, सुभाष टेंबे यांच्यासह मराठा समाज बांधव या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मराठा सामाजिक सांस्कृतिक विकास मंडळाच्या वतीने श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी स्वर अभिलाषा म्युझिकल यांचा कार्यक्रम, संध्याकाळी धावटे ग्रामस्थ मंडळ यांचा सुश्राव्य हरिपाठ झाला.

# रामचंद्र कदम उद्यान पंडीत पुरस्काराने सन्मानित



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरघर वडघर येथील प्रगतशील शेतकरी राम चंद्र कदम तथा कदमशेठ यांना नाशिक येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते उद्यान पंडीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उद्यान पंडीत पुरस्कारांसह इतर १८९ कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील प्रगतशील शेतकरी रामचंद्र कदम शेठ यांनी बोरावळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चाळीचा कोंड येथील ढवळी, कामथी, सावित्री नद्यांच्या त्रिवेणी संगमावर केलेल्या शेतीविषयक यशस्वी प्रयोगांमुळे राज्य सरकारने त्यांची उद्यान पंडीत पुरस्कारासाठी निवड केली.

# बंगळुरूची चेन्नईवर मात

**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये बुधवारी आलेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चेन्नई सुपर किंग्जवर १३ धावांनी विजय मिळवला. महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा यांच्यासारखे दिग्गज फलंदाज आपली कमाल दाखवू न शकल्यामुळे चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागला, तर दुसरीकडे बंगळुरूच्या गोलंदाजांनी चेन्नईच्या फलंदाजांना बांधून ठेवल्यामुळे बंगळुरूचा विजय सोपा झाला.

बंगळुरूने चेन्नईला विजयासाठी १७४ धावांचे लक्ष्य दिले होते, मात्र २० षटके संपेपर्यंत चेन्नई संघ फक्त १६० धावा करू शकला. या विजयासह आता बंगळुरूच्या प्लेऑफपर्यंत पोहचण्याचा आशा पल्लवित झाल्या आहेत, तर दुसरीकडे चेन्नई संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहे.



बंगळुरूने चेन्नईला विजयासाठी १७४ धावांचे लक्ष्य दिले, मात्र ही धावसंख्या गाठताना चेन्नईची धांदल उडाली. डेवॉन कॉन्वे वगळता चेन्नईचा एकही फलंदाज मोठी खेळी खेळू शकला नाही. सलामीला आलेल्या कॉन्वेने ३७ चेंडूंमध्ये ५६ धावा केल्या. कॉन्वेसोबत आलेला ऋतुराज गाडकवाड २३ चेंडूंमध्ये २८ धावा करु शकला. दुसऱ्या विकेटसाठी आलेला रॉबिन उथप्पा अवघी एक धाव करून बाद झाला.

तिसऱ्या विकेटसाठी अंबाती रायडूदेखील आपली कमाल दाखवू शकला नाही. त्याने अवघ्या १० धावा केल्या. त्यानंतर मोईन अलीने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने काही मोठे फटके मारत २७ चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या, मात्र हर्षल पटेलच्या चेंडूवर तो झेलबाद झाला. त्यानंतर मात्र फिनिशर म्हणून ओळख असलेला महेंद्रसिंह धोनी फक्त दोन धावा करू शकला. यानंतर चेन्नईच्या विजयाच्या आशा मावळल्या. रवींद्र जडेजा (३), ड्वेन प्रिटोरिअकस (१३), खास कामगिरी करु शकले नाहीत. २० षटके संपेपर्यंत चेन्नईला फक्त १६० धावा करता आल्या. परिणामी बंगळुरूचा विजय झाला.

याआधी चेन्नईने नाणेफेक जिंकून सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरूची विराट कोहली आणि कर्णधार फॅफ डू प्लेसिस ही जोडी फलंदाजी सलामीला आली. या जोडीने चांगली सुरुवात केली, मात्र हे दोन्ही आघाडीचे फलंदाज खास खेळी करू शकले नाहीत. संघाच्या ६२ धावा झालेल्या असताना प्लेसिस ३८ धावांवर बाद झाला. त्यानंतर कोहलीदेखील मैदानावर जास्त तग धरू शकला नाही. ३० धावांवर असताना तो त्रिफळाचित झाला. दुसऱ्या विकेटसाठी आलेला ग्लेन मॅक्सवेलही चांगली खेळी करू शकला नाही. तो अवघ्या तीन धावा करून बाद झाला. मग मधल्या फळीतील महिपाल लॅमरॉर (४२), रजत पाटीदार (२१), दिनेश कार्तिक (२६) या त्रिकुटाने संघाला सावरले. शेवटच्या फळीतील वानिंदू हसरंगा (१) आणि शाहबाज अहमद (०) जास्त धावा करू शकले नाहीत. परिणामी २० षटके संपेर्यंत बंगळुरूला १७३ धावा करता आल्या.

## श्री धापया महाराज कुस्ती आखाड्यात भावेश साळवी अजिंक्य

### 'आखाडा किंग' ठरला युवराज भगत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव अक्षय तृतियेपासून सुरू झाला. त्यानिमित्ताने १०० वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती कल्याणचा भावेश साळवी आणि नाशिकचा ज्ञानेश्वर केरे यांच्यात कुस्ती रंगली. साळवी याने केरे याला चितपट केल्याने तो अजिंक्य ठरला तर लहान गटातील नऊ कुस्त्या चितपट करणाऱ्या युवराज भगतला 'आखाडा किंग' म्हणून सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे या आखाड्यात महिलांच्या कुस्त्याही झाल्या.

कर्जत तालुका कुस्तीगिरी अध्यक्ष श्री भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी ज्येष्ठ पंच मारुती ठाकरे, दत्तात्रेय पालांडे, देवस्थानचे अध्यक्ष गणेश शिंदे, प्रकाश आणेकर, महेंद्र चंदन, मनोज वरसोलीकर, सचिन दगडे आदी उपस्थित होते. सकाळच्या सत्रात ४४ कुस्त्या झाल्या. त्यामध्ये महिलांच्या ५ कुस्त्या झाल्या तर दुपारच्या सत्रात ४१ कुस्त्या झाल्या. त्यामध्ये ६ महिलांच्या कुस्त्या झाल्या. अशा एकूण ८५ कुस्त्या झाल्या. दोन्ही सत्रात पंच म्हणून दिपक भुसारी, रमेश लोभी आणि दत्तात्रय म्हसे यांनी काम पाहिले. शेवटची कुस्ती कल्याणचा भावेश साळवी आणि नाशिकच्या ज्ञानेश्वर केरे यांच्यामध्ये रंगली. यामध्ये साळवी याने केरेला चितपट करून अजिंक्यपद पटकावले. या कुस्ती साठी कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी ११ हजारांचे रोख पारितोषिक ठेवले होते. अन्य कुस्ती रसिकांनीही यामध्ये रोख रकमा जाहीर केल्याने ही कुस्ती रोख १६ हजार ८०० रुपयांची होती.



सूत्रसंचालन दिनेश बागवे आणि दिलीप ठाकरे यांनी केले. स्मिता म्हामूणकर, पंकज बडेकर, अधिक जैन, अभिजित मुधोळकर, मंगेश देशमुख, आण्णा मोकल, नितीन गुप्ता यांनी विजेत्यांना पारितोषिके देण्यासाठी विशेष सहकार्य केले. मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, नाशिक आदी भागांतून आलेले पहेलवान स्पर्धेत सहभागी झाले होते. ग्रामीण भागातून आलेले असंख्य कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

## झुंझार पोयनाडतर्फे आज भव्य कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड संस्थेला स्थापन करून ६० वर्ष पूर्ण झाली असल्याने मंडळाच्या षष्टब्दीपूर्ती वर्षाच्या निमित्ताने उद्या शुक्रवारी (दि. ६) मे रोजी झुंझारच्या मैदानावर भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने होणाऱ्या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील प्रथम येणाऱ्या ३२ संघांना स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. विजेत्या संघांना, खेळाडूंना आकर्षक बक्षिसांची खैरात असणार आहे. सायंकाळी ४ वाजता स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्ह्यातील विविध क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. कबड्डी रसिकप्रेक्षकांनी स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन झुंझार युवक मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण व सचिव किशोर तावडे यांनी केले.

## पनवेलची तेजा सकपाळ गुणवंत खेळाडू पुरस्काराने सन्मानित

**अलिबाग : प्रतिनिधी**

पनवेलची महिला कबड्डी खेळाडू तेजा सकपाळ हिला क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे सन २०२२चा गुणवंत खेळाडू (महिला) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाच्या दिवशी अलिबागमधील पोलीस परेड मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तेजा सकपाळ हिला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक



अशोक दुधे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, तालुका क्रीडा अधिकारी वांजळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, विविध विभागांचे अधिकारी आणि क्रीडाप्रेमी नागरिक, महिला कबड्डी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तेजा हिने स्थानिक संघात खेळतांना संघाला यशाच्या शिखरावर नेऊन ठेवले. जिल्ह्यात संघाला विविध ठिकाणी अजिंक्यपद मिळवून दिले. २०१९मध्ये अखिल एकेफाय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व, काशी वाराणसी येथे झालेल्या अखिल भारतीय युनिव्हर्सिटी स्पर्धेत मुंबई युनिव्हर्सिटी संघाचे प्रतिनिधित्व, अश्वमेध, खेलो इंडिया स्पर्धेत प्रतिनिधित्व, वेस्ट झोन युनिव्हर्सिटी स्पर्धेत उत्तम खेळाचे प्रदर्शन, सध्या स्थानिक संघाला प्रशिक्षण देऊन जास्तीत जास्त खेळाडू घडविण्याचा काम करीत आहे.

मी जी इथपर्यंत पोहोचले याचे सर्व श्रेय मी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सुर्यकांत ठाकूर यांना देते, असे तेजा सकपाळ हिने सांगितले.

## महेंद्रसिंह धोनींचे अनोखे द्विशतक; चेन्नईकडून खेळला २००वा सामना

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी याने एक आगळावेगळा विक्रम नोंदवला आहे. धोनीने चेन्नई सुपर किंग्जकडून बुधवारी खेळलेला सामना २००वा ठरला आहे. याआधी हा विक्रम फक्त विराट कोहलीच्या नावावर होता.

विराटने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून आतापर्यंत २१८ सामने खेळले आहेत. कोहली आणि धोनी असे फक्त दोनच खेळाडू २००च्या क्लबमध्ये आहेत.

कोणत्याही एकाच फ्रँचायझीकडून २०० सामने खेळणाऱ्या खेळाडूंमध्ये सध्या विराट कोहली आणि महेंद्रसिंह धोनी हे दोनच खेळाडू आहेत. आगामी काळात किरॉन पोलार्ड हादेखील या क्लबमध्ये दाखल होऊ शकतो, कारण त्याने मुंबई संघाकडून आतापर्यंत १८७ सामने खेळले आहेत, सुरेश रैना या हंगामात कोणत्याही संघाकडून खेळत नाहीये. त्यानेदेखील चेन्नईकडून आतापर्यंत १७६ सामने खेळले आहेत. रोहित शर्माने मुंबई इंडियन्सकडून आतापर्यंत १७७ सामने खेळले आहेत.

## आयसीसी ट्वेन्टी-२० क्रमवारीत भारत अग्रस्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

मायदेशातील दिमाखदार कामगिरीच्या बळावर भारतीय संघाने २०२१-२२च्या हंगामाअखेरीस ट्वेन्टी-२० क्रिकेट क्रमवारीचे अग्रस्थान टिकवले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बुधवारी जाहीर केलेल्या वार्षिक कसोटी क्रमवारीत मात्र भारत नऊ गुणांनी पिछाडीवर पडल्यामुळे ऑस्ट्रेलियानंतर दुसऱ्या स्थानावर आहे.



न्यूझीलंड वार्षिक एकदिवसीय क्रमवारीत अव्वल संघ ठरला. ट्वेन्टी-२० क्रमवारीत पाच गुणांच्या फरकाने इंग्लंड दुसऱ्या स्थानावर आहे. पुरुषांच्या वार्षिक कसोटी क्रमवारीत ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या स्थानी असलेल्या भारतापासून नऊ गुणांची आघाडी मिळवली आहे, तर पाकिस्तानचा संघ पाचव्या स्थानी पोहोचला आहे. न्यूझीलंड कसोटी क्रमवारीत तिसऱ्या तर, दक्षिण आफ्रिका चौथ्या स्थानी आहे. भारताला एका गुणाचा फायदा झाला असून त्यांचे ११९ गुण झाले आहेत, तर भारताविरुद्ध २०१८मध्ये ४-१ अशी मालिका इंग्लंडने जिंकली होती, पण ही मालिका क्रमवारीतून हटवण्यात आल्याने त्यांना सर्वाधिक नऊ गुणांचे नुकसान झाले आहे.

## भारतीय फुटबॉल महासंघाची 'कॅग'कडून होणार चौकशी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) गेल्या चार वर्षांत केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांची दखल आता थेट केंद्रीय युवा आणि क्रीडा मंत्रालयाकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे देशाचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) यांनी पथक नेमून अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या आर्थिक व्यवहारांचे सखोल लेखापरीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतीय फुटबॉल महासंघाच्या गेल्या चार आर्थिक वर्षांच्या कागदपत्रांचे लेखापरीक्षण करण्यासाठी 'कॅग'ने एक पथक नेमले आहे. दरम्यान, आम्हाला या संदर्भात कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. लेखापरीक्षण झालेली आर्थिक ताळेबंद पत्रके सादर करणे ही सामान्य बाब आहे, असे भारतीय फुटबॉल महासंघाकडून सांगण्यात आले.




## बंगळुरूला विजय अन् चाहत्याला प्रेमिका मिळाली!

### तरुणीने सर्वांसमोर गुडघ्यावर बसून केले प्रपोज



**पुणे : प्रतिनिधी**

चेन्नई आणि बंगळुरू यांच्यात बुधवारी झालेला सामना एका खास कारणामुळे चर्चेचा विषय ठरला. सामना रंगात आलेला असताना एका मुलीने बंगळुरू संघाच्या चाहत्याला सर्वांसमोर प्रपोज केले. विशेष म्हणजे या मुलानेही तरुणीच्या प्रेमाचा स्वीकार केला.

एकीकडे बंगळुरू आणि चेन्नई या दोन संघांत चुरशीची लढत होत असताना एका तरुणीने तिच्यासोबत आलेल्या तरुणाला थेट गुडघ्यावर बसून प्रपोज केले. हा सर्व प्रकार कॅमेरामॅनने आपल्या कॅमेऱ्यात कैद केला. हजारो लोकांसमोर या तरुणीने प्रेम असलेल्या मुलाला प्रपोज केले. विशेष म्हणजे हा तरुण बंगळुरू संघाचा चाहता आहे. त्याने या तरुणीच्या प्रेमाचा स्वीकार करीत तिला मिठीत घेतले.

सामन्यात बंगळुरू संघाचा विजय झाला, तर दुसरीकडे बंगळुरूच्या चाहत्यालाही आपली प्रेमिका मिळाल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला. सोशल मीडियावर तर चेन्नईचा पराभव आणि बंगळुरूचा विजय यापेक्षा गुडघ्यावर बसून प्रपोज करणारी तरुणी आणि बंगळुरूचा चाहता असलेला तिचा प्रियकर यांचीच चर्चा होत आहे.

|| श्री हरेश्वर प्रसन्न || || श्री सिध्दिविनायक प्रसन्न || || श्री पंचमुखी हनुमान प्रसन्न ||

|| सुखम् हॉस्पिटल ||

तुम्ही घडविलेला, तुमच्या साथीने घडलेला ''दशकपूर्ती सोहळा''.
डॉ. संतोष सुदाम जाधव लिखित ''झुंज सुखम् ची कोरोनाशी'' या अनुभवांच्या गाथेचे प्रकाशन तसेच ''सुखम् पोर्टल' आणि "BMD App" शुभारंभ
शुक्रवार, दि.६ मे २०२२ रोजी सायं. ४.०० ते ८.०० वा.
सुखम् हॉस्पिटल ११ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.
हा अविस्मरणीय क्षण साजरा करीत आहोत. त्यानिमित्त आयोजिलेल्या स्नेहमेळाव्यास अवश्य उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.

प्रमुख अतिथी
मा. श्री. प्रशांत ठाकूर साहेब (आमदार पनवेल विधानसभा, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष)
मा. श्री. पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर साहेब (एम. डी. मेडिसिन)
मा. श्री. डॉ. संजय ओक साहेब (बालशल्य चिकित्सक, अध्यक्ष, कोविड टास्क फोर्स महाराष्ट्र)

कार्यक्रम स्वरुप
* वीरेंद्र केंजळे प्रस्तुत ''साज'' ऑर्केस्ट्रा (मराठी हिंदी जुन्या गीतांची सुरेल मैफल) - सायं. ४ ते ६ वा.
* ''झुंज सुखम् ची कोरोनाशी'' या अनुभवांच्या गाथेचे प्रकाशन
* कोविड योद्धयांचा गुणगौरव सोहळा
* स्नेह भोजन रात्री ८.०० ते आपल्या आगमना पर्यंत

निमंत्रक
समस्त सुखम् आणि जाधव परिवार
स्थळ : वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल. मो. : ९००४६५७९८८/९९८७७२९९८८




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com